संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 12 | Marathi Monthly | Thane, 1 June 2026 to 30 June 2026 | Pages 16 | Price : 10/-

# ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे ठाण्यात ‘४ काळ्या कामगार-संहितां’ विरोधात भव्य आक्रोश मोर्चा; मान्यवरांची उपस्थिती



**या ४ संहितांमुळे कामगारांचे मूलभूत हक्क धोक्यात येऊन शोषण, असुरक्षितता व कंत्राटीकरण वाढणार असल्याची वस्तुस्थिती ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी यावेळी जनतेसमोर मांडली.**

**आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त ‘धर्मराज्य पक्ष’ व ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ’ यांच्या वतीने ठाण्यात ‘राष्ट्रीय संपत्ती-निर्मात्या’ कामगारांचा भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. सायं. ४.३० वाजता सुरू झालेल्या या मोर्चात विविध औद्योगिक क्षेत्रांतील कामगार, कर्मचारी, पदाधिकारी व ठाणेकर जनता मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.**

केंद्र सरकारने लागू केलेल्या ‘४ काळ्या कामगार-संहितां’विरोधात हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या संहितांमुळे कामगारांचे मूलभूत हक्क धोक्यात येऊन शोषण, असुरक्षितता व कंत्राटीकरण वाढणार असल्याची वस्तुस्थिती यावेळी जनतेसमोर मांडण्यात आली. **कामगार संघटनांची ताकद कमी करणे, नोकरीतील स्थैर्य नष्ट करुन ‘‘Hire Fire’’ धोरणाला चालना देणे, अशा विविध मुद्द्यांवर तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.**

मोर्चादरम्यान कामगारांनी घोषणाबाजी करत आपल्या मागण्या प्रखरपणे मांडल्या. ‘४ कामगार संहितां’ची तत्काळ रद्दबातल करावी, कामगारांचे हक्क अबाधित ठेवावेत; तसेच, कंत्राटी-कामगार पद्धतीचं निर्मूलन करावे, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

**या मोर्चात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली, त्यामध्ये ॲड. विजय कुर्ले, ॲड. नाना अहिरे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष (ग्रामीण) चेतनसिंह पवार, काँग्रेस ठाणे जिल्हा पदाधिकारी राहुल पिंगळे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ज्येष्ठ नेत्या वंदनाताई शिंदे व कॉ. उदय चौधरी, आनंदा होवाळ यांचा समावेश होता.** ...पृष्ठ क्र. ३ वर


## कोकणातील आंबा-काजू बागायतदारांच्या न्यायासाठी सर्वपक्षीय पत्रकार परिषद




दि. १३ मे २०२६ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघ, आझाद मैदान येथे आंबा आणि काजू बागायतदारांच्या प्रश्नांवरील सर्वपक्षीय आणि नागरी समाजातील चळवळीची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेस ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे उपस्थित होते.

कोकणातील आंबा, काजू व मत्स्य व्यवसायाशी संबंधित शेतकरी गंभीर संकटात सापडले असून त्यांना तातडीने न्याय मिळावा, संपूर्ण कर्जमुक्ती जाहीर करावी तसेच नुकसानग्रस्त बागायतदारांना योग्य आर्थिक मदत देण्यात ...पृष्ठ क्र. ३ वर

‘‘४ काळ्या कामगार-संहिता’ (४ Black Labour-Codes), या ‘४ काळ्या शेतकी-कायद्यां’सारख्याच श्रमिकवर्गाचं दमन-शोषण करणाऱ्या असल्यामुळे... आम्ही सत्तेवर येताच त्या रद्द करु’’
....इति, राहुल गांधी



***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

...पृष्ठ क्र. ९ वर


अंतरंग


‘कॉर्पोरेट भारत’ अचानक डॉ आंबेडकरांकडे का वळत आहे?
...सिद्धार्थ प्रभाकर
पृष्ठ क्र. ४


उष्णतेच्या लाटेत लपलेलं सत्य : विकास की विनाश?
ॲड. गिरीश राऊत
पृष्ठ क्र. ७


गोड साखरेचे कडवट कथानक
...आशिष मुनका
पृष्ठ क्र. ११

प्रधानमंत्री सौर घर योजनेला घोडा; मालकांच्या तिजोरीत भर?
...आनंद शितोळे
पृष्ठ क्र. १६





*'पाईल्स' (मूळव्याध) झालेला मनुष्य जसा कुथत-कुंथत जगतो; तशी 'एपस्टिन-फाईल्स'मुळे भाजप-संघीय सत्ताधाऱ्यांची मोठी कठीण व अवघड अवस्था झालीय! ते देश चालवत नसून, फक्त 'भाजप पक्ष आणि संघ' एवढ्या दोनच गोष्टी चालवतायत... ते देश चालवत नसून, त्यांनाच वॉशिंग्टन आणि तेल अव्हिवमध्ये बसलेले दुसरेच कुणी चालवताय; आणि, तिथून इशारे आले की, त्यांना चक्क पाकिस्तानच्याही प्रेमाचे उमाळे येतात. यांनी सत्तेवर आल्यानंतर कधि इराण-रशियाने स्वस्त दरात पुरवलेल्या तेलाचा जनतेला फायदा मिळू दिला नाही आणि आता, हे दोन्ही देश जाहिरपणे सांगतायत की, आजही आम्ही आमच्या परंपरागत मित्राला स्वस्तात तेल पुरवायला तयार आहोत; तरीही, 'एपस्टिन-फाईल्स'च्या भितीमुळे आणि गौतम अदानीला वाचवण्याच्या नादामुळे... तसेच, 'पेगॅसस' हे हेरगिरी करणारं इस्रायली छुपं 'सॉफ्टवेअर', विरोधक-पत्रकार-न्यायाधीश वगैरे प्रभृतींच्या मोबाईलमध्ये टाकण्याच्या सोयीमुळे...आमचं कर्मदरिद्री व 'मतचोरी' (Vote-Chori) करुन सत्तेवर आलेलं भाजप-संघीय सरकार, ते तेल घ्यायला नकार देतंय...आणि, भारतीय जनतेला ऊर्जासंकट व महागाईच्या झळा सोसायला लावतेय...धन्य धन्य ते, जनतेच्या तोंडाला फेस आणणारं व गळ्याला फास लावणारं, तथाकथित 'हिंदुत्ववादी' सरकार!*

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

# कॉ. प्रशांत सरखोत यांनी घेतली 'धर्मराज्य पक्षाध्यक्ष' राजन राजे यांची सदिच्छा भेट

**शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ सत्ताकेंद्रित राजकारण सुरू असल्याची टीका**



दि. १३ मे २०२६ रोजी मार्क्सवादी शेतकरी नेते कॉ. प्रशांत सरखोत यांनी 'धर्मराज्य पक्षा'च्या ठाणे येथील कार्यालयात पक्षाध्यक्ष राजन राजे यांची सदिच्छा भेट घेतली.

या भेटीदरम्यान पर्यावरण, शेती, राजकारण आणि ग्रामीण भागासमोरील विविध गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. वाढते औद्योगिकीकरण, जंगलांची होणारी नासधूस, अनियंत्रित शहरीकरण आणि हवेतील वाढते कार्बन उत्सर्जन यामुळे पृथ्वीच्या तापमानात सातत्याने वाढ होत असून त्याचा थेट परिणाम शेती, पाणी, पर्यावरण आणि सर्वसामान्य जनजीवनावर होत असल्याची गंभीर चिंता यावेळी व्यक्त करण्यात आली.

हवामान बदलामुळे अवकाळी पाऊस, उष्णतेच्या लाटा, पाण्याचे संकट, पीक उत्पादनातील घट आणि रोगराई वाढत असून शेतकरी वर्ग सर्वाधिक संकटात सापडत असल्याचे मत चर्चेदरम्यान मांडण्यात आले.












मेसर्स. अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्री प्रा. लि., रोहा, रायगड येथील या कंपनीतील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सभासद असलेले कामगार आपल्या न्याय्य हक्कांसाठी व विविध प्रलंबित मागण्यांसाठी दि. १० एप्रिल २०२६ पासून महासंघाच्या नेतृत्वाखाली बेमुदत संपावर ठामपणे बसले आहेत.

संपस्थळी 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी भेट देत संपकरी कामगारांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी कामगारांच्या अडचणी, व्यवस्थापनाकडून होत असलेला अन्याय व प्रलंबित मागण्यांबाबत माहिती जाणून घेत पुढील लढ्याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी महासंघाचे उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, महासचिव महेशसिंग ठाकूर, खजिनदार अजित सावंत तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी व मोठ्या संख्येने कामगार बांधव उपस्थित होते. संपस्थळी कामगारांमध्ये मोठा उत्साह व एकजूट पाहायला मिळाली.

कामगारांवर होणारा अन्याय कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. कामगारांच्या न्याय्य मागण्या मान्य होईपर्यंत 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चा लढा अधिक ताकदीने सुरू राहील, असा ठाम निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अंनिस म्हणजे धर्माचे शुद्धीकरण करणारी चळवळ - जगदीश काबरे

**'धर्मामध्ये ज्या वेळी विकृती शिरतात तेव्हा त्या धर्माचे शुद्धीकरण करण्याची गरज असते. अंधश्रद्धा निर्मूलन हा धर्मात शिरलेल्या विकृतीचे शुद्धीकरण करण्याचा भाग आहे,' असे मत संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने वेंगुर्ल्यातील लेखक देवदत्त परुळेकर यांनी लिहिलेल्या 'वारकरी संतांची अंधश्रद्धा निर्मूलनावरील विवेकी ग्रंथमाला' या मालिकेतील दहा संतांवरील पुस्तिकेचे प्रकाशन डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी व्यक्त केले.**

तर दुसरीकडे हमीद दाभोळकर महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी निमित्त काढलेल्या 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रा'च्या विशेषांकात म्हणतात की, 'जोतिबा फुले यांनी समाजसुधारणेसाठी धर्म पूर्णपणे नाकारण्याऐवजी धर्मसुधारणेची वाट चोखाळली होती. त्यांनी मांडलेली निर्मिकाची कल्पना आणि सार्वजनिक सत्यधर्माची संकल्पना या दोन्ही गोष्टी याच धर्मसुधारणेच्या विचारांना पुढे नेतात. त्यांनी निर्मिकाची कल्पना मान्य केली असली, तरी त्यांनी जगाचे नियंत्रण करणाऱ्या शक्तींना मात्र पूर्णपणे नाकारले होते. त्यांच्या कल्पनेतला धर्म देखील हा कुठल्या धर्मग्रंथाच्या वरती अवलंबलेला नव्हता, तर तो सत्याच्या कसोटीवर टिकेल असाच होता. डॉ नरेंद्र दाभोळकर आणि महा.अंनिस हाच वारसा चालवत आहेत.'

या दोन्ही परिच्छेदावरून हे स्पष्ट होत आहे की, महा.अंनिस ही देवाधर्माला विरोध न करणारी आणि संविधानानुसार श्रद्धेचे स्वातंत्र्य मान्य करणारी धर्म सुधारणा चळवळ आहे. म्हणून काही कार्यकर्त्यांचे असे म्हणणे आहे की, आता या चळवळीचे नाव 'धर्म सुधारणा चळवळ' असेच ठेवायला हवे. नाहीतरी अंधश्रद्धा निर्मूलन हे शब्द नकारात्मक भावना पोसणारे आहेत, त्यामुळे त्या शब्दांचा वापर न करता 'धर्म सुधारणा चळवळ' असे जर म्हटले तर जास्त योग्य राहील. **म्हणून अंनिस वार्तापत्राच्या या गटाने अंनिस चळवळीचे 'धर्म सुधारणा चळवळ' हे नवीन नाव धारण करून वापरात आणायला सुरुवात करावी, असा विचार काही कार्यकर्त्यात मनात फोफावत आहे. त्यामुळे अंनिसच्या विविध गटातील नामसाधर्म्यामुळे होणारा गोंधळही टळेल. तुम्हाला काय वाटते?**

# आयपीएलच्या निमित्ताने !

त्यांच्यावर टीका करू नका; त्यांचा हेतू विधायक आहे. ते तुम्हाला स्थितप्रज्ञ बनवत आहेत!

सध्या आयपीएल सुरु आहे. काही आठवड्यापूर्वी सलामीच्या सामान्यांमध्ये ५२ कोटी दर्शकानी टीव्ही आणि इतर स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर ३२ कोटी मिनिटे मॅचेस बघितल्या; आयपीएलची सर्व सिझनची आकडेवारी बघून आपली बुबुळे बाहेर येतील आणि हा पुरावा दिला जात आहे की, भारतात स्पोर्ट्स इंडस्ट्री वेगाने वाढत आहे हे सांगण्यासाठी हे घडत आहे, ज्यावेळी जवळपास प्रत्येक लहान मोठ्या शहरात मुलांच्या खेळण्यासाठीच्या मैदानांवर लँड माफिया आक्रमण करत आहेत. मोजक्या खाजगी/कॉर्पोरेट शाळा सोडल्या; तर, लाखो शाळांमधील मुलामुलींना साधे खेळ खेळण्यासाठी छोटे, दगड धोंडे नसलेले, चांगली माती असणारे मैदान देखील नाहीये.

खेळाची मैदाने, बागा, मोकळ्या जागा आक्रसत आहेत. त्यावर असलेली रिझर्वेशन्स जनतेने निवडून दिलेले जनप्रतिनिधी उठवत आहेत. सर्व काही कायद्याला धरून!

हा विरोधाभास कोट्यवधी लोकांच्या अंगवळणी पाडला जात आहे, टोकाच्या विरोधाभासाचे न्यू नॉर्मल नकळत गळी उतरवले जात आहे; खाली फक्त तीन उदाहरणे. या सगळ्यांचे स्केल आठवून बघा. दडपण येईल.

आर्थिक, भौतिक ओढग्रस्तीमुळे कोट्यवधी नवरा बायकोचे, आईवडील मुलांचे, रक्ताचा नात्यांचे संबंध ताणलेले असताना टीव्ही मालिकांद्वारे अस्तित्वात नसलेली एकत्र कुटुंबे, त्यातील सासू-सुना, नणंद-भावजयी, त्यांच्यातील नकली प्रेम लुटुपुटुची भांडणे दाखवून कौटुंबिक मूल्ये रुजवण्याचा दावा केला जात आहे.

कोट्यवधी कुटुंबे, अल्प आणि बेभरवशाचे उत्पन्न, बेरोजगारी, अपुरे वेतनमान, किफायतशीर न राहिलेली शेती, महागाई, सतत वाढत्या कर्जबाजारीपणाच्या ओझ्याखाली दबलेली असताना. वर्तमानपत्रे, टीव्ही, सोशल मीडियावर दागिने, नवनवीन मोबाईल, इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स, फॅशन इंडस्ट्री, खाद्यपदार्थ यांच्या आकर्षक जाहिरातींचा मारा केला जात आहे

ग्रामीण भागात आतबट्याची शेती करावी लागणाऱ्या




तरुणांची लग्ने होत नाहीत, तर शहरी भागात नोकरी/नियमित उत्पन्न नसल्यामुळे लग्ने करू शकत नाहीत.

त्यांना नट/नट्याच्या लफड्याच्या, लग्नाच्या बातम्या, त्यांना झालेल्या छोट्या बाळांच्या, त्यांनी विकत घेतलेल्या कोट्यवधी रुपयांच्या घरांच्या/बंगल्यांच्या, अंतर्गत सजावटीच्या चित्रफिती/रसभरीत वर्णने दाखवून जिभल्या चाटायला लावले जात आहे.

आजूबाजूला बघितले तरी अशा विरोधाभासाची अनेक उदाहरणे समोर येतील. कोणीही आम्हाला खेळण्यासाठी मैदाने द्या, आम्हाला उपभोगाच्या वस्तू खरेदी करण्याएवढी क्रयशक्ती द्या, अशी मागणी लावून धरत नाहीत.

त्यांना दोष देऊ नका. त्यांचा हेतू स्वच्छ असतो; तो हेतू असतो तुम्हाला स्थितप्रज्ञ बनवण्याचा!

मानवी दुःख, यातना, भावनिक गुंतवणूक हे सारे भ्रम आहेत, हे तुमच्या मनावर बिंबवण्याचा!

तुमचे प्रश्न तुमचे व्यक्तिगत प्रश्न आहेत; कदाचित दुर्दैवाचा फेरा असेल. तुमच्या प्रश्नाचा शासनाच्या आर्थिक धोरणांशी/त्याचा ओमिशन्स आणि कमिशन्सशी काहीही संबंध नाही, हे तुम्हाला शिकवण्याचा त्यांचा हेतू असतो.

दुसऱ्याच्या सुखात स्वतःचे सुख शोधण्याचा, स्वतःचे दुःख विसरायला लावण्याचा महान, उदात्त विचार....

***...संजीव चांदोरकर***

**'४ काळ्या कामगार-संहितां'...** ...पृष्ठ क्र. १ वरून

त्याचप्रमाणे या मोर्चात धर्मराज्य कामगार कर्मचारी महासंघ महासचिव महेशसिंग ठाकूर, उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, सचिव समीर चव्हाण, धर्मराज्य पक्षाचे सचिव नरेंद्र पंडित, ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर, उपाध्यक्ष सचिन शेट्टी, पोर्णिमा सातपुते, जगन्नाथ सलगर आदी पदाधिकारी व इतर कार्यकर्ते तसेच कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी कामगारांच्या एकजुटीचे महत्त्व अधोरेखित करत, '४ काळ्या कामगार-संहितां'मुळे जसा आपत्कालीन अवस्थेत विमानाचा वैमानिक, 'मे डे' (May Day) असा वाचविण्यासाठी संदेश (SOS) पाठवतो; तशीच अवस्था 'कामगारां'ची झालीय... पण, लक्षात कोण घेतो? कामगार-चळवळ संपवून कामगारांना कंत्राटी-कामगार किंवा 'मुदतबंद-कामगार' (FTE... Fixed Term Employee) या नात्याने 'गुलाम' बनवणं सुरु आहे... म्हणूनच यासारखे लढे, कामगारांच्या हक्कांसाठी निर्णायक ठरणार असल्याने, महाराष्ट्रातील सर्व कामगारांनी 'धर्मराज्य पक्षा'च्या झेंड्याखाली एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.

मोर्चा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला व भविष्यातही या प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा धर्मराज्य पक्षाने दिला आहे.

**कोकणातील आंबा-काजू बागायतदारांच्या न्यायासाठी सर्वपक्षीय पत्रकार परिषद** ...पृष्ठ क्र. १ वरून

यावी, या प्रमुख मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या आगामी मोर्चाच्या पार्श्वभूमीवर ही पत्रकार परिषद घेण्यात आली.

त्याचप्रमाणे या पत्रकार परिषदेत विनायक राऊत (शिवसेना उबाठा), भाई जगताप (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), कॉ. अजित नवले (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष), कॉ. प्रकाश रेड्डी (भारतीय कम्युनिस्ट पक्ष), प्रभाकर नारकर (जनता दल सेक्युलर), डॉ. दीपक पवार (मराठी अभ्यास केंद्र) तसेच विविध शेतकरी, सामाजिक व राजकीय संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी व्यापक जनआंदोलन उभे करण्याची गरज असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# ‘कॉर्पोरेट भारत’ अचानक डॉ आंबेडकरांकडे का वळत आहे?




अलीकडच्या काळात भारतात एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिकदृष्ट्या असामान्य घटना दिसून येत आहे - मोठे उद्योगसमूह, प्रभावशाली राजकीय शक्ती आणि अभिजन संस्था वाढत्या प्रमाणात डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे नाव, प्रतिमा आणि वारसा स्वीकारताना दिसतात. विशेषतः रिलायन्स इंडस्ट्रीजसारख्या उद्योगसमूहांकडून डॉ आंबेडकरांचा गौरव होत असल्याने आंबेडकरी वर्तुळात आणि चिकित्सक अभ्यासकांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जवळपास सत्तर वर्षे भारतीय उद्योगविश्वाने डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक दृष्टिकोनाकडे तुलनेने दुर्लक्ष केले असताना, आता अचानक कॉर्पोरेट भारत डॉ. आंबेडकरांकडे का वळत आहे, हा प्रश्न स्वाभाविक आहे.

या प्रश्नाचे उत्तर एका कारणात शोधता येणार नाही. त्यामागे राजकारण, अर्थकारण, सामाजिक वैधता, बाजारपेठीय रणनीती आणि बदलते सामाजिक वास्तव यांचा परस्परसंबंध दिसतो. हे खरे वैचारिक परिवर्तन आहे की नियंत्रित प्रतीकात्मक गैरवापर, याचे उत्तरही सरळसोट नाही.

डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर अनेक दशकांपर्यंत त्यांचे स्थान मुख्यतः दलित चळवळी, संविधान अभ्यास आणि जातिविरोधी बौद्धिक परंपरेपुरते मर्यादित राहिले. मुख्य प्रवाहातील भारतीय अभिजन-राजकीय, सामाजिक आणि आर्थिक-यांनी त्यांना औपचारिक आदर दिला; परंतु, त्यांच्या सामाजिक क्रांतिकारी विचारांशी व्यापक बांधिलकी दाखवली नाही. महात्मा गांधी किंवा जवाहरलाल नेहरू यांच्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांना दीर्घकाळ सर्वमान्य राष्ट्रीय प्रतीक म्हणून उभे केले गेले नाही. मात्र, मागील दोन दशकांत परिस्थितीत मोठा बदल झाला. आज डॉ. आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नसून संविधान, सामाजिक न्याय, लोकशाही आणि आधुनिक भारतीय नागरिकत्वाचे प्रतीक म्हणून उभे राहिले आहेत. त्यामुळे जवळपास प्रत्येक प्रमुख राजकीय पक्ष, विचारप्रवाह आणि आता कॉर्पोरेट संस्थाही त्यांना स्वीकारताना दिसतात. यामागील मूलभूत सत्य असे की, डॉ. आंबेडकरांचे ऐतिहासिक महत्त्व आणि नैतिक अधिकार आता इतके व्यापक झाले आहेत की, त्यांना दुर्लक्षित करणे कोणालाही शक्य राहिलेले नाही.

भारतीय भांडवलशाहीच्या बदलत्या स्वरूपानेही या प्रक्रियेला चालना दिली आहे. पूर्वीचे उद्योगपती मुख्यतः राज्यसत्तेच्या आश्रयावर, मर्यादित नागरी बाजारपेठांवर आणि उच्चवर्णीय व्यावसायिक जाळ्यावर अवलंबून होते. परंतु रिलायन्ससारख्या कंपन्या आज दूरसंचार, डिजिटल सेवा, किरकोळ व्यापार, कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमव्यवस्था आणि वित्तीय सेवा यांद्वारे कोट्यवधी भारतीयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. अशा कंपन्यांना केवळ पारंपरिक अभिजन वैधता पुरेशी राहत नाही; त्यांना व्यापक सामाजिक स्वीकाराची आवश्यकता असते. जात, वर्ग, भाषा आणि प्रदेश यांच्या पलीकडे स्वतःला ‘‘संपूर्ण भारताचे प्रतिनिधित्व करणारी संस्था’’ म्हणून सादर करणे ही त्यांची व्यावसायिक गरज बनते.

या पार्श्वभूमीवर डॉ आंबेडकरांचे प्रतीक अत्यंत उपयुक्त ठरते. डॉ. आंबेडकरांचा गौरव केल्याने कंपनी स्वतःला संविधाननिष्ठ, आधुनिक, सर्वसमावेशक आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील म्हणून सादर करू शकते. यामुळे ‘‘फक्त श्रीमंत अभिजनांचे कॉर्पोरेट साम्राज्य’’ अशी प्रतिमा सौम्य करण्यास मदत होते. आधुनिक भांडवलशाहीत प्रतीकात्मक राजकारण हे आर्थिक रणनीतीचाच भाग बनते. आज कंपन्या केवळ वस्तू किंवा सेवा विकत नाहीत; त्या स्वतःची एक नैतिक आणि राष्ट्रीय प्रतिमा उभारण्याचाही प्रयत्न करतात. त्या स्वतःला राष्ट्रनिर्माते, तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करणारे आणि सर्वसामान्यांच्या आकांक्षांचे प्रतिनिधी म्हणून मांडतात. या चौकटीत डॉ. आंबेडकर हे शिक्षण, सामाजिक गतिशीलता, स्वाभिमान आणि संविधानिक अधिकारांचे प्रतीक ठरतात.

या प्रक्रियेचा राजकीय संदर्भही महत्त्वाचा आहे. नरेंद्र मोदी आणि भाजप यांच्या काळात डॉ. आंबेडकरांना व्यापक राष्ट्रवादी चौकटीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न सातत्याने दिसतो. संविधान दिन, स्मारके, प्रतीकात्मक कार्यक्रम आणि सार्वजनिक भाषणांद्वारे डॉ. आंबेडकरांना राष्ट्रीय कथानकाचा अविभाज्य भाग बनवण्याचा प्रयत्न झाला आहे. यामागील राजकीय तर्क स्पष्ट आहे. डॉ. आंबेडकरांना केवळ विरोधी किंवा सत्ताविरोधी चळवळींच्या ताब्यात राहू देता येणार नाही. लोकशाहीत राष्ट्रीय प्रतीकांवर नियंत्रण हे वैचारिक शक्तीचे साधन असते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना राष्ट्रवादी कथानकात सामावून घेणे, हे व्यापक सामाजिक वैधता निर्माण करण्याचे साधन ठरते.

मोठे उद्योगसमूह अनेकदा सत्ताधारी राजकीय-सांस्कृतिक प्रवाहांशी स्वतःला जुळवून घेतात; कारण, त्यांच्या व्यवसायावर राज्यसत्तेशी असलेले संबंध, धोरणात्मक स्थैर्य आणि सार्वजनिक प्रतिमा यांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे कॉर्पोरेट भारतातील डॉ. आंबेडकरांचा स्वीकार हा समकालीन भारतीय राष्ट्रवादातील डॉ. आंबेडकरांच्या मुख्य प्रवाहीकरणापासून वेगळा पाहता येत नाही.

तथापि, येथे एक अत्यंत महत्त्वाचा फरक समजून घ्यावा लागतो. डॉ. आंबेडकरांचा सन्मान करणे आणि डॉ. आंबेडकरांच्या मूळ सामाजिक-आर्थिक चिकित्सेला स्वीकारणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्था, ब्राह्मणवादी सामाजिक वर्चस्व, आर्थिक विषमता आणि सत्तेच्या केंद्रीकरणावर कठोर टीका केली होती. त्यांनी वारंवार इशारा दिला की, सामाजिक आणि आर्थिक विषमता कायम राहिली तर राजकीय लोकशाही पोकळ ठरेल. परंतु, कॉर्पोरेट आणि मुख्य प्रवाहातील राजकीय कथानक प्रामुख्याने डॉ. आंबेडकरांच्या संविधानवाद, शिक्षण, गुणवत्ता, उद्योजकता आणि समावेशकता या बाजूंवर भर देते. त्यांच्या श्रमिक राजकारणाची, आर्थिक समतेच्या आग्रहाची किंवा सामाजिक संरचनेवरील मूलभूत टीकेची चर्चा तुलनेने कमी होते.

म्हणून आज ज्या ‘‘आंबेडकरवादाचा’’ प्रचार होताना दिसतो, तो अनेकदा एक नियंत्रित, सौम्य आणि संस्थात्मकदृष्ट्या स्वीकारार्ह आंबेडकर असतो-जो राज्यसत्ता, कॉर्पोरेट प्रतिमा आणि मुख्य प्रवाहातील राष्ट्रवादाशी सुसंगत राहतो. इतिहासात असे अनेकदा घडले आहे की क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांना नंतर सत्ताधारी व्यवस्थाच आपल्या चौकटीत सामावून घेते.

याचा अर्थ असा नाही की, प्रत्येक कॉर्पोरेट गौरव पूर्णतः ढोंगी आहे किंवा त्यामागे कोणतीही प्रामाणिकता नाही. सामाजिक जाणीवा काळानुसार बदलतात. काही अभिजन घटक खरोखरच जातीय विषमतेचे दुष्परिणाम, संविधानिक मूल्यांचे महत्त्व आणि सामाजिक समावेशकतेची आवश्यकता ओळखत असतील. परंतु, सार्वजनिक ...पृष्ठ क्र. ५ वर जीवनात प्रामाणिकता आणि रणनीतिक स्वार्थ हे अनेकदा

# सावरकर, माफीनामे आणि इतिहासाचा वास्तववादी संदर्भ


सावरकरांचे वंशज सात्यकी सावरकर यांनी काल कोर्टात कबूल केलं की सावरकरांनी पाच माफीनामे इंग्रजांना लिहून दिले. राहुल गांधींच्या विरोधात सात्यकी सावरकरांनी दाखल केलेला खटला इथंच संपल्यात जमा आहे. 'माफीवीर' या शब्दामुळे दावा दाखल केला होता. आता ॲड. मिलिंद पवार यांनी घेतलेल्या उलटतपासणीत माफीची कबुली फिर्यादीनेच दिल्यावर या खटल्यात काय शिल्लक आहे? कितीदा माफी मागितली तर 'माफीवीर' म्हणता येते, याची कोणती स्पष्टता कायद्यात आहे?

हिंदुत्ववाद्यांना ते माहित नव्हतं असं नाही, कबूल करत नव्हते एवढंच. कबूल केलं, हे बरं झालं.

इंग्रजांची एकदाही माफी न मागितलेले गांधी लेचेपेचे आणि सावरकर मात्र पाच वेळा माफी मागूनही 'वीर' अशी खोटारडी मांडणी गेली पंच्याहत्तर वर्षं चालू आहे, तिला आता तरी लगाम लागावा.

इंग्रजांनी सावरकरांना बघा कसं काळ्या पाण्यावर पाठवलं आणि गांधी-नेहरूंना बघा कशा साध्या कैदेत ठेवलं, असाही एक अपप्रचार सतत चालतो. कायद्याचं अगाध अज्ञान असल्याशिवाय असा बाळबोधपणा साधता येत नाही. गांधी-नेहरू अहिंसक सत्याग्रह करीत. अहिंसक सत्याग्रह हा तत्कालीन IPC नुसार गंभीर अपराध नव्हता. फार तर कायदा आणि सुव्यवस्था बिघडवली, इतकाच गुन्हा लावला जाऊ शकायचा. जमावबंदी आदेश तोडला वगैरे.

१९१० साली सावरकरांना इंग्रजांनी अटक केली ती जॅक्सन या उपजिल्हाधिकाऱ्याच्या हत्येच्या कटात सहभागी



18

PROCEEDINGS OF THE

HOME DEPARTMENT, AUGUST 1920.

Imperial Legislative Council.
Rejection of petition to release Savarkar.

QUESTION AND ANSWER IN THE IMPERIAL LEGISLATIVE COUNCIL REGARDING THE RELEASE OF THE SAVARKAR BROTHERS.

REJECTION OF A PETITION SUBMITTED BY V. D. SAVARKAR PRAYING FOR THE RELEASE UNDER THE AMNESTY OF HIMSELF AND HIS BROTHER.


Cellular Jail, Port Blair,
The 30th March 1920.

To

The CHIEF COMMISSIONER of ANDAMANS.

In view of the recent statement of the Hon'ble Member for the Home Department to the Government of India, to the effect that "the Government was willing to consider the papers of any individual, and give them their best consideration if they were brought before them"; and that "as soon as it appeared to the Government that an individual could be released without danger to the State, the Government would extend the Royal clemency to that person," the undersigned most humbly begs that he should be given a last chance to submit his case, before it is too late. You, Sir, at any rate, would not grudge me this last favour of forwarding this petition to His Excellency the Viceroy of India, especially and if only to give me the satisfaction of being heard, whatever the Government decisions may be.

1. The Royal proclamation most magnanimously states that Royal clemency



आरोपी म्हणून आणि शस्त्रास्त्र उपलब्ध करून वाटणे या आरोपांखाली. IPC च्या तत्कालीन १२१, १२२, १२३ खाली. या तिन्ही कलमांना Rigorous Imprisonment अर्थात सक्तमजुरीची शिक्षाच होती. आज आपण ही सगळी कृती स्वातंत्र्य मिळावे म्हणून केली असं मानत असलो, तरी तत्कालीन सरकारसाठी हे गंभीर गुन्हे होते, ब्रिटिश सत्तेविरुद्धचा विद्रोहच होता.

आरोप हिंसेचा असेल तर कडक शिक्षा आणि अहिंसक सत्याग्रह असेल तर साधी कैद, हे त्यावेळीही न्यायाचं तत्त्व होतं, आजही आहे. ओरड मात्र भलतीच चालते. ती एकतर कायद्याच्या अज्ञानातून असते, नाहीतर जन्मजात बदमाशपणातून.

न वाचणे हा तिकडचा मोठा प्रॉब्लेम आहे. समजा उद्या वरून आदेश आला, तर 'सावरकर माफीनामा शताब्दी'सुद्धा डीजे लावून आणि सर्वत्र फ्लेक्स लावून आयोजित करतील, इतके विद्वान तिकडे भरलेले आहेत.

१. सावरकर उत्तम कवी होते.

२. सावरकर विज्ञानवादी होते.

३. स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी क्रांतिकारी भाग घेतला; पण इंग्रजांना बाँड लिहून दिल्यावर त्यांना तो सहभागही संपवावा लागला.

एवढ्या तीन वाक्यांत सावरकर सांगायचे सोडून सावरकरांनीच स्वातंत्र्य मिळवून दिलं, असे दावे करणे हास्यास्पद आहे.

सावरकरांना इथल्या बहुसंख्य हिंदूंनी कधीही आपला नेता मानलं नाही. गांधीच हिंदूंचे नेते होते. पहिल्या चार सार्वत्रिक निवडणुका सावरकरांचा पक्ष त्यांच्या हयातीत लढला. भारतभरात लोकसभेच्या अनुक्रमे ४, २, २ आणि ० अशा जागा सावरकरांच्या पक्षाला मिळाल्या. त्यावेळी सावरकर स्वतः हयात होते. भारतभरातली त्यांच्या पक्षाची 'लोकप्रियता' ही एवढीच होती. जिनांच्या मुस्लिम लीगसोबत त्यांच्या पक्षाने १९३७ च्या प्रांतिक निवडणुकांमध्ये केलेली युती हा भारतीय इतिहासातला हिंदू महासभेवरचा मोठा कलंक आहे, जो कधीही मिटणार नाही.

सावरकर गांधी खून खटल्यात सहआरोपी होते; मात्र सबळ पुराव्याअभावी निर्दोष सुटले. पुढे न्या. जीवनलाल कपूर आयोगानं सावरकरांवर खटला चालवताना पोलिसांनी सावरकरांचे अंगरक्षक अप्पा कासार आणि सचिव दामले यांच्या साक्षीच घेतल्या नाहीत, या गंभीर त्रुटीवर बोट ठेवलं. या साक्षी झाल्या असत्या, तर सावरकर निर्दोष सुटले असते की नाही, हा काळानं अनुत्तरित ठेवलेला प्रश्न आहे.

*Vishwambhar Choudhary/fb*

## 'कॉर्पोरेट भारत' अचानक डॉ आंबेडकरांकडे का वळत आहे? ...पृष्ठ क्र. ४ वरुन

एकत्र अस्तित्वात असतात. एखादा उद्योगपती डॉ. आंबेडकरांचा आदर करत असतानाच सामाजिक वैधता, बाजारपेठीय विस्तार, राजकीय समीकरणे आणि सकारात्मक प्रतिमा यांचाही लाभ घेऊ शकतो.

परंतु, या बदलत्या परिस्थितीत केवळ कॉर्पोरेट भारतालाच नव्हे, तर दलित पक्ष, आंबेडकरी सामाजिक संघटना आणि व्यापक आंबेडकरी चळवळींनाही स्वतःकडे नव्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. दीर्घकाळ दलित चळवळींचे केंद्रस्थान अनुसूचित जातींच्या स्थानिक, तात्कालिक आणि अत्यंत आवश्यक प्रश्नांवर राहिले, जे ऐतिहासिकदृष्ट्या न्याय्यही होते. परंतु, आज भारतीय समाजातील संघर्षाचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे. धर्माधारित ध्रुवीकरण, जातीय ध्रुवीकरण, संविधानिक संस्थांचे क्षीण होणे, आर्थिक विषमता, माहिती आणि माध्यमांवरील केंद्रीकरण, लोकशाहीतील असमतोल आणि सामाजिक अविश्वास हे केवळ एखाद्या एका समुदायाचे प्रश्न राहिलेले नाहीत; ते संपूर्ण भारतीय राष्ट्रजीवनाचे मूलभूत प्रश्न बनले आहेत.

याच कारणामुळे आंबेडकरी चळवळीसमोर आता एक मोठी ऐतिहासिक जबाबदारी उभी राहते-स्वतःला केवळ ''एका पीडित समाजाच्या प्रतिनिधी''पुरते मर्यादित न ठेवता भारतीय संविधानवाद, सामाजिक लोकशाही, वैज्ञानिक दृष्टी, समताधिष्ठित राष्ट्रवाद आणि मानवी प्रतिष्ठा यांच्या व्यापक राष्ट्रीय प्रकल्पाचे नेतृत्व करणारी शक्ती म्हणून उभे करण्याची. धर्मवाद आणि जातीवाद हे फक्त सामाजिक अन्यायाचे प्रश्न नाहीत; ते भारतीय संविधानाच्या गाभ्यावरच आघात करणारे प्रश्न आहेत, हे संपूर्ण देशाला पटवून देणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. कारण आंबेडकरवादाचा मूळ आशय केवळ दलित मुक्तीपुरता सीमित नव्हता; तो संपूर्ण भारतीय समाजाच्या लोकशाही पुनर्रचनेचा प्रकल्प होता.

भविष्यातील आंबेडकरी राजकारण आणि सामाजिक चळवळींनी केवळ प्रतीकात्मक प्रतिनिधित्व, निवडणूक-आधारित मर्यादित राजकारण किंवा स्थानिक सामाजिक प्रश्नांपुरते स्वतःला सीमित ठेवणे पुरेसे ठरणार नाही. शिक्षण, अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, माध्यमव्यवस्था, पर्यावरण, जागतिक भांडवलशाही, मानवाधिकार, ज्ञानव्यवस्था आणि आधुनिक राष्ट्रराज्याच्या बदलत्या स्वरूपावरही त्यांना स्पष्ट, सुसंगत आणि सक्षम भूमिका घ्यावी लागेल. राष्ट्रीयच नव्हे; तर, वैश्विक स्तरावर नेतृत्व करण्याची बौद्धिक आणि संघटनात्मक क्षमता विकसित करणेही आवश्यक ठरेल.

जर आंबेडकरवादाने स्वतःला केवळ स्मारके, जयंती, मर्यादित ओळख-राजकारण किंवा प्रतिक्रियात्मक आंदोलनांपुरते सीमित ठेवले; तर, त्याची परिवर्तनकारी शक्ती हळूहळू कमी होण्याचा धोका आहे. परंतु, जर त्याने संविधानवाद, सामाजिक न्याय, आधुनिकता, वैज्ञानिक विचार आणि मानवी स्वातंत्र्य यांच्या सार्वत्रिक मूल्यांवर आधारित व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोन स्वीकारला, तर तो केवळ दलित समाजाचाच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या लोकशाही भविष्याचा सर्वात सक्षम वैचारिक पाया ठरू शकतो.

शेवटी, डॉ. आंबेडकरांविषयीची खरी बांधिलकी भाषणांवर, स्मारकांवर किंवा जाहिरातींवर मोजली जाणार नाही. ती नेतृत्वातील प्रतिनिधित्व, रोजगारातील समावेशकता, श्रमिक धोरणे, सामाजिक गतिशीलता आणि वास्तविक समानतेसाठीची तयारी यांवर मोजली जाईल. हा निकष कॉर्पोरेट भारतालाही लागू आहे आणि आंबेडकरी चळवळींनाही!

कॉर्पोरेट भारतातील डॉ. आंबेडकर स्वीकार हा भारतीय समाज आणि राजकारणातील मोठ्या परिवर्तनाचा भाग आहे. तो लोकशाहीतील सामाजिक दबाव, बदलती बाजारपेठ, राजकीय गरज, सामाजिक वैधतेचा शोध आणि बदलती सामाजिक जाणीव यांमधून निर्माण झाला आहे. परंतु या प्रक्रियेमुळे एक मूलभूत प्रश्नही उभा राहतो. डॉ. आंबेडकर हे केवळ सत्तेला स्वीकारार्ह राष्ट्रीय प्रतीक बनून राहतील का? की त्यांचे विचार अजूनही भारतीय समाजातील खोलवरच्या विषमता, वर्चस्व, धर्मवाद आणि जातीवादाला आव्हान देत राहतील? आणि त्याचबरोबर, आंबेडकरी चळवळ स्वतः ही स्थानिक प्रश्नांच्या मर्यादेपलीकडे जाऊन संपूर्ण राष्ट्रासाठी एक नैतिक, बौद्धिक आणि राजकीय दिशा देणारी शक्ती बनू शकेल का? भारतीय लोकशाहीचे भवितव्य कदाचित याच दोन प्रश्नांच्या उत्तरांवर अवलंबून असेल !

***...सिद्धार्थ प्रभाकर***

*(समाज माध्यमातून साभार...)*

# अस्वस्थ करणारा चित्रपट

*पुणे येथील लोकशाही उत्सवात २९/०१/२०२४ रोजी हिमोलिंफ (HEMOLYMPH Invisible Blood) नावाचा चित्रपट पाहिला.*

हिमोलिंफ म्हणजे रक्त असूनही रक्तपात करताना न दिसणारे रक्त. किडे, मुंग्या चिरडताना रक्त दिसत नाही. चिरडणाऱ्यांना रक्त दिसत नसल्यामुळे त्यांनी केलेल्या हिंसाचाराचे गांभीर्य लक्षात येत नाही. त्यामुळे हिंसाचार करणारे बेलगाम होतात. अमानुष अत्याचार, मारहाण, हिंसाचार करणाऱ्यांवर हिंसाचार केल्याचा सकारात्मक परिणाम होत नाही. आपण अतिशय वाईट वर्तन केल्याचा पस्तावा होत नाही. परिणामतः हिंसाचार करण्याचे आदेश ते गपगुमान पाळतात. त्यामुळे व्यवस्थेत हिंसाचार थैमान घालतो. सर्वसामान्य माणसे किड्या-मुंग्यांसारखी चिरडली जातात.

चिरडल्या जाणाऱ्या माणसांचे रक्त न्यायाधीशांना, मीडियाला दिसत नाही. इतकेच नाही तर समाजालाही दिसत नाही. परिणामी हिंसाचार अक्षरशः बोकाळतो.

हिमोलिंफ चित्रपटात व्यवस्थेत केला जाणारा हिंसाचार सत्य घटनेचा आधार घेऊन चित्रित करण्यात आला आहे. मुंबईत बॉम्बस्फोटानंतर पोलीस संशयित आरोपी म्हणून एका शिक्षकाला अटक करतात. निर्दोष शिक्षकाचे नाव आहे अब्दुल वाहिद. पोलीस त्याचा अतिशय छळ करतात. वाहिद व त्याच्या कुटुंबीयांना व नातलगांनाही त्रास देतात. वाहिद त्याच्यावर होणारे अत्याचार सहन करतो. शांतपणे विचार व वर्तन करतो. तुरुंगातील इतरांना मदत करतो. कायद्याचा अभ्यास करतो. पत्रकारिता शिकतो.

वाहिद त्याच्यावर होणारे अत्याचार रोखण्यासाठी सनदशीर मार्गाने प्रयत्न करतो. दीर्घकाळ अन्याय सहन करत तो अखेर निर्दोष सुटतो. ज्यांच्यावर आरोप सिद्ध होतात, त्यांना शिक्षा सुनावली जाते.

वाहिदला निर्दोष असूनही छळ सहन करावा लागतो. त्याच्यावर झालेल्या अन्याय व अत्याचारांची माहिती समाजाला व्हावी म्हणून तो 'बेगुनाह कैदी' नावाचे पुस्तक लिहितो. हे पुस्तक चित्रपटाचा पायाभूत आधार आहे.

भारतातील विविध तुरुंगांत सुमारे तीन लाख साठ हजार कच्चे कैदी आहेत. हा चित्रपट बघताना मला भीमा-कोरेगाव प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या फादर स्टेन यांच्यावर झालेला अन्याय आठवला. त्यांना द्रव पदार्थ पिता येत नव्हते, म्हणून त्यांच्या वकिलांनी स्ट्रॉ देण्याची मागणी केली. न्यायाधीशांनी नकार दिला. ८२ वर्षे वय असलेल्या फादर स्टेन यांचा तुरुंगात मृत्यू झाला.

१ फेब्रुवारी - २०२४ रोजीच्या 'लोकसत्ता'मध्ये पाच तरुणांना दिल्ली पोलिसांनी विजेचे धक्के दिले; तसेच, अन्य प्रकारेही छळ केल्याची बातमी आहे. विरोधी पक्षाशी संबंध असल्याचे कबूल करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी आमचा छळ केला. ७० कोऱ्या कागदांवर आमच्या बळजबरीने सह्या घेतल्या, असे मनोरंजन डी., सागर शर्मा, ललित झा, अमोल शिंदे व महेश कुमावत या आरोपींनी न्यायालयात लेखी सादर केले आहे.

प्रस्थापित व्यवस्था असंख्य माणसांना किडे-मुंग्या समजून छळते. व्यवस्थेकडून केला जाणारा क्रूर छळ चित्रपटात चित्रित




केला आहे. चित्रपट पाहत असताना मेंदूला रक्तपुरवठा कमी पडून मुंग्या लागल्याचा भास होतो.

डॉ. रियाझ अन्वर, रोहित कोकाटे, रुचिरा जाधव, मेजर विक्रमजीत व सागर पाबळे यांच्या भूमिका अविस्मरणीय अशा आहेत. चित्रपट पाहत असताना आपण भयंकर हिंसक वास्तव बघत असल्याचा अनुभव येतो. चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक सुदर्शन गमरे त्यांच्या कल्पनेतील वास्तव साकारण्यात यशस्वी झाले आहेत.

आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळावी असा हा चित्रपट आहे. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या चित्रपटाला सहभाग मिळायला हवा, असे मला वाटते. चित्रपटातील सर्व कलाकार व चित्रपट पूर्ण करण्यासाठी कार्य केलेल्या सर्वांना धन्यवाद व पुढील वाटचालीस शुभेच्छा!

***- शिवाजी गायकवाड***

---

**''तो नसतो कुठल्या मंदिर-मस्जिदीत, नसतो कुठल्या गुरुद्वारा-चर्चमध्ये... तो तुमच्याआमच्या भोवतीच, अगदी आपल्याला सदैव खेटून बसलेला असतो आणि उघड्या डोळ्यांनी असतो की,....''**

***आंधळ्या देशप्रेमाचा, जातिधर्माचा आणि कॉर्पोरेटीय-कारकीर्दीचा 'काळा चष्मा' चढवलेल्यांना...समाजातील इतर कुणाच्या पायाखाली काय जळतंय, कोण कसं होरपळतंय...याची काहीही दिक्कत नसते!***

जंगलातल्या आदिवासींना जंगलाबाहेरची जंगली जुलूमशाही-हुकूमशाही राजवट, त्यांच्या निर्दय-षडयंत्री भांडवली क्लृप्त्या...याच्याशी काही देणंघेणं नसतं आणि शहरातल्या सुशिक्षितांना (त्यात सगळा शहरी अभिजनवर्ग आलाच) आपल्या चंगळवादी-जीवनशैलीपुढे व कॉर्पोरेटीय अथवा सार्वजनिक सेवेतील 'करियर'पुढे...जंगलं किती तुटतायत, आदिवासींना शोषण-दमन-विस्थापनासह कशाकशाला तोंड द्यावं लागतंय; तसेच, खाणकाम व काँक्रिटच्या विकास-प्रकल्पांपुढे निसर्ग किती भयंकर ओरबाडला जातोय...याच्याशी फारसं देणंघेणं नसतं!

कामगारांना, शेतकऱ्यांच्या समस्या व लढे आणि शेतकऱ्यांना, कामगारांचे हक्क व लढे (अर्थात, मुळातून कामगारांनाच स्वतःच्या हक्कांची फारशी जाणीव आजकाल उरलेली नाही, ही वेगळीच गोष्ट आहे)

...हे सगळं तो पहात असतो (आणि, भारतापुरतं बोलायचं तर),

१) निवडणूक-आयोगाकरवी केलेलं **EVM/ SIR** वगैरेचं गुन्हेगारी-व्यवस्थापन

२) ग्राहक व कामगार-कर्मचाऱ्यांचं निर्घृण शोषण करुन कमावलेला कॉर्पोरेटीय मोठा पैसा

३) महाकाय सार्वजनिक व खाजगी प्रकल्पांच्या टक्केवारीतून जमा केलेल्या प्रचंड काळ्या पैशाचं निवडणुकीदरम्यान कौशल्यपूर्ण वाटप व व्यवस्थापन

४) केवळ 'आर्थिक-सोय' म्हणून राजकारणात उतरलेले आणि पक्ष वरिष्ठांच्या 'हुकूमाचे ताबेदार' म्हणून, आपली सदसद्विवेक बुद्धी हरवून बसलेले बिनडोक-स्वार्थी 'राजकीय-कार्यकर्ते'

५) आम जनतेप्रति, लोकशाही-राजवट व राज्यघटनेप्रति असलेल्या जबाबदाऱ्यांबाबत ज्यांच्या जाणिवा...निव्वळ, उदरनिर्वाहाच्या लागलेल्या आपल्या सोयीपुढे, क्षीण वा बोथट झालेल्या असतात; असे लष्करी जवान आणि सशस्त्र पोलिस

**...या अशा 'पंचसूत्री'वर आधारित, आधुनिक रक्तपिपासू-निर्दय-शोषक 'भांडवली-व्यवस्था' (Vampire-State System) भारतासह जगभर धुमाकूळ घालताना, तो तुम्हाला 'कर्म-स्वातंत्र्य' बहाल करुन त्रयस्थपणे पहात असतो... पण, लक्षात ठेवा, माणसांनी आपले डोळे सोयिस्कररित्या मिटून घेतले असले; तरी परमात्मास्वरुप 'निसर्ग' टक्क जागा आहे आणि तो अवघ्या मानवजातीच्या महापातकांचा भरलेला 'घडा', त्यांच्याच हाती ठेवत... पुढील उण्यापुऱ्या काही दशकातच 'निवाडा' करणार आहे; दुर्दैवाने, त्यात सजीवसृष्टीतील अन्य अश्राप-निष्पाप जीव भरडले जाणार आहेत...!!!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...*The First 'Green-Political Party' Of India)*



# उष्णतेच्या लाटेत लपलेलं सत्य : विकास की विनाश?



उष्णतेची अभूतपूर्व लाट देशभर चालू आहे. परंतु हवामान खाते, वेधशाळा व प्रसारमाध्यमे, याबाबत रूढ पध्दतीने कालबाह्य माहिती देत आहेत. त्यामुळे जनता व राजकारणी गाफील आहेत.

लोकसत्तामध्ये, 'देशात उष्मातिरेक' ही मुख्य बातमी आहे. यात नेहमीप्रमाणे, बंगालच्या उपसागरावरून आलेल्या वाऱ्यांचा उल्लेख करून चुकीचे कारण दिले आहे. तापमान कमी दाखवले आहे. उदा. मुंबईचे तापमान ३५°से दिले आहे. प्रत्यक्षात गेले काही दिवस मुंबईचे उच्चतम तापमान ४०°से च्या वर आहे. ते ४२°से ते ४३°से होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या कोणत्याही खात्याला, वैज्ञानिक संस्थेला वा तज्ज्ञाला तापमानवाढ व हवामान बदलाची अद्ययावत माहिती नाही. देशाने सन १९९० पासून भोगवादी अर्थव्यवस्था स्वीकारल्याचा हा परिणाम आहे.

वास्तवात पृथ्वीच्या सरासरी तापमानात २°से ची वाढ झाली, हे ऑगस्ट २०२०मध्ये नोंदल्याचे नासा व इतर वैज्ञानिक संस्थांनी जाहीर केले आहे. तापमान न थांबता वाढत राहण्याच्या स्थितीत तापमानवाढ गेली आहे ही गंभीर वस्तुस्थिती, ६ नोव्हेंबर २०१७ रोजी जर्मनीत 'बॉन' येथे खास परिषद घेऊन जागतिक हवामान संघटनेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. पेट्टेरी टलास यांनी सर्व जगाला सांगितली आहे .

मानवजात व जीवसृष्टी नष्ट होत आहे, हा या व इतर अहवालांचा भीषण अर्थ आहे. हा जागतिक तापमानवाढीचा परिणाम आहे. त्या पार्श्वभूमीवर सध्याच्या लाटेकडे पहावे. याला खरे कारण 'कार्बन डायऑक्साईड' व इतर उष्णता शोषणाऱ्या वायुंचे उत्सर्जन करणारे व हरितद्रव्याचा नाश घडवणारे औद्योगिकरण आहे, मोटार व इतर वाहने, वीज व सीमेंट प्रामुख्याने आहेत. परंतु प्रसारमाध्यमे ही गोष्ट लपवत आहेत. त्यामुळे लोक वीजवापर कमी करत नाहीत आणि अधिक वीज-अधिक उष्मा-थंडाव्यासाठी अधिक वातानुकूलन म्हणजे अधिक वीज - परत अधिक उष्मा असे भयंकर दुष्टचक्र अधिक वेग घेत आहे. ते तोडण्यासाठी जनतेला सत्य समजले पाहिजे . परंतु मंत्रालयांचा पूर्ण परिसर वातानुकूलित करणारे, एसी मोटारीतून फिरणारे, ते कसे जाणणार आणि जनतेला समजावणार?

फक्त वातानुकूलन बंद केले; तर, ४५% वीज वाचेल. कोळसा कमी जळेल, पृथ्वीला थोडा दिलासा मिळेल आणि शहरांत थंडावा येईल, कारण वातानुकूलन यंत्रे स्थानिक उष्णता वाढवतात. मोटारींऐवजी सर्वांनी बस, एसटीने प्रवास केला तर तापमान आणि प्रदूषण कमी होईल. देशातील बहुतांश लोकांकडे तर एसी किंवा मोटार नाही. उद्या सर्वजण एसी - मोटार घेत आहेत, अशी कल्पनाही करता येत नाही. वाढती उष्णता आपला लवकरच बळी घेणार याची जाणीव होऊ दिली नसल्याने समृद्ध जीवन जगण्याच्या भ्रमात सुख व प्रतिष्ठा सोडवत नाही.

याच अंकातील मुंबई पुरवणीत पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांची प्रकल्पांबाबत विधाने आहेत जसे की, पर्यावरणाचे निकष पाळून विकास करणे. त्यांना परिस्थितीचे गांभीर्य समजलेले दिसत नाही. पूर्ण पृथ्वी ना विकास क्षेत्र मानले पाहिजे अशी आज परिस्थिती आहे; कारण, कसाही विचार केला तरी या विकासात कार्बन उत्सर्जन, हरितद्रव्याचा नाश आणि पृथ्वीचे लचके तोडणे होणारच. पृथ्वी, निसर्ग आता याला परवानगी देत नाही, तशी ती कधी दिलीही नव्हती. मुंबई असो वा इतरत्र, विकासाच्या नावाखाली केले जात असलेले सर्व प्रकल्प तात्काळ थांबवले पाहिजे. जनता आणि नेत्यांसह मानवजात व जीवसृष्टीला अधिक वेगाने नष्ट करणारे हे प्रकल्प कुणासाठी आहेत?

ऑर्वेलच्या '१९८४' कादंबरीप्रमाणे आज देशात स्थिती आहे. त्यात 'शांतता मंत्रालय' प्रत्यक्षात युद्ध घडवत असते आणि 'स्वातंत्र्य मंत्रालय' दडपशाही करते. पर्यावरण नाशाला कारण ठरणाऱ्या औद्योगिकीकरणाचे व प्रकल्पांचे, पर्यावरणमंत्री समर्थन करत आहेत.

मुळात, स्वयंचलित यंत्रापासूनचे औद्योगिकरण ही पृथ्वीवरील जीवनाच्या विरोधात जाणारी गोष्ट आहे. पृथ्वी हा सजीवांची धारणा व विकास करणारा एकमेव ग्रह आहे. गेली ४११ कोटी वर्षे या ग्रहावर जीवनाचा अद्भूत प्रकल्प निसर्गाकडून राबवला जात आहे. या जीवसृष्टीला अस्तित्व देणाऱ्या विलक्षण महान प्रकल्पाला, मानवनिर्मित 'विकास प्रकल्प' नावाची विनाशकारी कृती विरोध करत आहे, बंद पाडत आहे. मानवजातीचे उच्चाटन घडवत आहे.

या अंकात तेलाच्या किंमतीबाबत अग्रलेख आहे. मात्र त्यात मानवजात वाचवण्यासाठी पॅरिस करार २°से ची वाढ रोखण्यास सांगतो याचा व आता तापमानवाढ अपरिवर्तनीय झाली असल्याचा, त्यामुळे कोळसा, तेल व वायू जाळणे थांबवण्याचा कोणताही उल्लेख नाही. जणू अर्थव्यवस्था अस्तित्वापेक्षा जास्त महत्त्वाची आहे.

लोकसत्ताच्या संपादकांनी काही दिवसांपूर्वी ऊर्जा समस्येवर भाषण दिले. त्यात पुढील ५० ते ६० वर्षे कोळसा, तेल, वायू वापरत राहायचे आहे, असे ते म्हणाले. हे मानवजातीचा अंत घडवणे आहे. मानवजातीचे फक्त सुमारे २५ ते ३० वर्षांत उच्चाटन होणार हे स्पष्ट झाले असल्याने एकीकडे नासाच्या संवेदनशील शास्त्रज्ञांनी, 'वित्तीय संस्थांनी खनिज इंधनांना अर्थसहाय्य देऊन नये' या साठी सत्याग्रह केला. स्वतःला अटक करून घेतली व ते तुरूंगात गेले. त्यांच्यापेक्षा या संपादकांना जास्त समजते असा त्यांनीच (बि)घडवलेल्या वाचकांचा गोड गैरसमज असावा.

या पुरवणीत दुसऱ्या पानावर वरच्या बाजूला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेबाबत मार्गदर्शन करणारा 'अर्थव्यवस्था - मूलभूत अभ्यास' या लेखातील वीटभट्टीच्या छायाचित्रात बालके दिसत आहेत.

खालील बाजूला तेल व नैसर्गिक वायू महामंडळातील नोकऱ्यांबाबत नोकरीची संधी हा लेख, तेल उत्खनन करणाऱ्या प्लॅटफॉर्मच्या छायाचित्रासह आहे. मानवजात वाचवण्याची शेवटची संधी आपण तेलामुळे गमावत आहोत, याची थोडीही जाणीव यांना नाही.

व्हिवा पानावर 'हवामान बदलांचा मागोवा' या नावाचा, हवामान बदल व तापमानवाढीशी प्रत्यक्ष संबंध नसलेला, फक्त त्या विषयावर डॉक्टरेट मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनीचा गजालींमध्ये मोडणारा लेख आहे.

अशारितीने, अस्तित्व, जीवन गमावले जात असताना, जीवनशैलीच्या नशेत सुशेगाद, फील गुड अवस्थेत मराठी वाचकांना व भारतीयांना ठेवले गेले आहे.

आपला,

***ॲड. गिरीश राऊत***

निमंत्रक : भारतीय जीवन व पृथ्वीरक्षण चळवळ

## 'देस' म्हणे

*देवापुढे मंदिरी । करी बलात्कार खून । सोवळा पुजारी*
*मूक साक्षी होई । मूर्ती ती सावळी ।।*
*गायीपुढे गोठ्यात । करी बलात्कार खून । कुणी मामाकाका*
*निर्विकार गाय । देई झाकण्यास शेण ।।*
*जातधर्म भुलीचे । औषध देहामनात । शुद्ध हरपून*
*सारी मने दगडी । होती 'मूर्ती'मंत ।।*
*पिसाळती मग । जात नि धर्म । मृत्यूच्या माघारी*
*मानुषतेवर होत राही । बलात्कार वारंवार ।।*
*कायदा स्थितप्रज्ञ । बलात्कारिता मृत । कोवळाच देह*
*स्वप्ने कोवळी तिची हो । महासंस्कृतीला खत ।।*
*आवरी आकांत ! हो विवेकी शांत । खंबीर परी*
*'देस' म्हणे निर्णायक । आता हल्ला बोल !*

*...मोहन देस*




बुद्धपौर्णिमेनिमित्त ठाणे शहरातील कोपरी परिसरात 'गौतम मित्र मंडळा'च्या वतीने आयोजित ''बुद्धपौर्णिमा व संयुक्त जयंती महोत्सव-२०२६'' हा कार्यक्रम दि. ०१ मे ते दि. ०५ मे-२०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडला.

या सोहळ्यास 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. तसेच, भाजपचे कोपरी-पाचपाखाडीचे आमदार संजय केळकर यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्री. राजेश गाडे यांनी मा. राजन राजे यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला.

आपल्या मनोगतात मा. राजन राजे यांनी तथागत बुद्धांच्या विचारांचा आजच्या जगभरातल्या युद्धजन्य परिस्थितीत व निसर्ग-पर्यावरणावर निरंतर होणाऱ्या आघातांचा विचार करता....सर्वत्र प्रसार होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज निर्माण करण्याचे आवाहन केले तसेच युवकांनी बुद्धांच्या शिकवणीचा आदर्श घेऊन सामाजिक परिवर्तनासाठी पुढे यावे, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी 'गौतम मित्र मंडळा'चे उपाध्यक्ष श्री. अमुल कदम, सेक्रेटरी श्री. कुंदन सपकाळे, खजिनदार श्री. सुमित कदम, श्री. अनंता चंदने यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिनांक २३/०५/२०२६ रोजी आयोजित पदग्रहण सोहळ्यादिवशी, ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी मा. श्री. राहुलजी पिंगळे यांची निवड झाल्याबद्दल 'धर्मराज्य पक्षा'चे सचिव नरेंद्र पंडित तसेच पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी सदिच्छा भेट घेत त्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने नूतन पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तसेच त्यांच्या भावी राजकीय व सामाजिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करणारे शुभेच्छापत्रही प्रदान करण्यात आले. सामाजिक बांधिलकी, लोकहिताची भूमिका आणि जनसामान्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व म्हणून मा. राहुलजी पिंगळे यांच्या कार्यास व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!



वाशी मार्केट, मुंबई येथील भाजीपाला व इतर व्यवसाय करणाऱ्या पनवेल व परिसरातील स्थानिक महिलांनी आज 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांची ठाणे कार्यालयात भेट घेतली.

यावेळी त्यांनी मुंबई महानगरपालिका प्रशासन तसेच स्थानिक नेत्यांकडून होत असलेल्या त्रासाबाबत आणि मार्केटमधील विविध समस्यांविषयी सविस्तर चर्चा केली; तसेच, संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य करण्याची विनंतीही त्यांनी यावेळी केली.

''कारणाशिवाय घराबाहेर डुंकायची गरज का आहे''
''मृत्यूला डोळे भिडवण्याची गरज का आहे''
''सर्वांना माहीत आहे, बाहेरची हवा आहे खुनी''
''मग खुन्याला डिवचण्याची गरज का आहे''
''जीवन हे वरदान आहे, त्याचा सन्मान करा''
''स्मशान सजवण्याची गरज का आहे?''
''मन रमवायला आपल्या घरात रमणे पुरेसे आहे''
''येताजाता गावगल्ल्या हुंदडण्याची गरज का आहे''
मूळ हिंदी कवी : गुलजार
मराठी भावानुवाद : सुधीर राजाराम देवरे

''इनाकारन घरनं भायेर दुकी पाव्हानी गरज काय''
''मयतवरच डोळा वटारानी गरज काय''
''बठ्ठास्ले ठाऊक शे, भायेरनी हवा खुनी शे''
''मंग खुनीले हाटकून आरी टोचानी गरज काय''
''हयाती हायी देवनी करनी, तिन्ही ख्यालीखुशाली घ्या''
''दरोज म्हसनवटी सजाडानी गरज काय''
''मन रवळाले घरमाच हात फिराई रवळाई जा''
''चावळगोंधान्या गावगल्ल्या भवडानी गरज काय''
मूळ हिंदी कवी : गुलजार
अहिराणी भावानुवाद : सुधीर राजाराम देवरे

## ''४ काळ्या कामगार-संहिता' (४ Black Labour-Codes), या '४ काळ्या शेतकी-कायद्यां'सारख्याच श्रमिकवर्गाचं दमन-शोषण करणाऱ्या असल्यामुळे...आम्ही सत्तेवर येताच त्या रद्द करु'' ....इति, राहुल गांधी



**नोकरी-सुरक्षिततेचा पायाच उखडून टाका; म्हणजे, कामगारांच्या एकजुटीची इमारतच उभी रहाणे नाही...''ना रहे बाँस, ना रहे बाँसुरी'', अशा भाजप-संघीय कुटील-विचारधारेवर आधारित आहेत, '४ काळ्या कामगार-संहिता'...!!!**

सगळी भाजप-संघीय सरकारे वरकरणी पुतनामावशीसारखं कामगार-कर्मचारीवर्गाबद्दल खोटा कनवळा दाखवत आम्ही फक्त, या '४ काळ्या कामगार-संहितां'द्वारे सगळे कामगार-कायदे एकत्रित व सुटसुटीत केलेत, असं म्हणत असले; तरी ती त्यांच्या नेहमीच्या प्रचारकी 'गोबेल्स-तंत्रा'सारखी 'लोणकढी थाप' आहे! ब्रिटनमध्ये ६५ हून अधिक तर, अमेरिकेत एकूण १८० च्या आसपास कामगार-कायदे प्रभावीपणे अंमलात आणले जात असताना...त्यांना आजवर कधि कुठली प्रशासकीय-अडचण जाणवली नाही; मग, भाजप-संघीय सरकारलाच, ती का व्हावी...??? ...या प्रश्नातच, सगळं उत्तर आपसूकच आलं!

**कामगारवर्गाला व भोळ्याभाबड्या जनसामान्यांना 'हिंदुत्वा'च्या नावाखाली गंडवण्यासाठी...''श्रम, शक्ति, निती-२०२५'' अथवा 'मनुस्मृती, याज्ञवल्यस्मृती, नारदस्मृती, शुक्रनिती, अर्थनिती' वगैरे संस्कृत-शब्दांचं अवडंबर माजवून, भुलवण्याचा (Sugar-Coating); भाजप-संघीय ढोंगी-शब्दबंबाळ 'मुखवटा' टराटरा फाडून, खरी विषाक्त-वस्तुस्थिती खालीलप्रमाणे अगदी थोडक्यात मांडता येईल...**

**उद्योगाच्या व्याख्येत व कामगार-कायदे लागू होण्यासाठी आवश्यक किमान-संख्येत मोठे कामगार-घातकी बदल...**

**१) ''भांडवली-व्यवस्थेचा 'द्रोणागिरी' पर्वत आपल्या हातावर उचलून धरणाऱ्या 'कामगार' नावाच्या 'हनुमाना'ला...४ नव्या कामगार-संहितांद्वारे 'माकड' बनवण्याचे भाजप-संघीय डावपेच मतपेटीतून उधळून लावा!''**

**२) ''रामासाठी जन्मभूमी अयोध्येत 'राममंदिर'...तर, औद्योगिक-सेवा क्षेत्रात कामगार-चळवळीसाठी 'स्मशानभूमी' तयार करणाऱ्या...कामगार-शेतकऱ्यांचा नं. १ चा शत्रू असलेल्या भाजप-संघीय 'मोदी-शाह' सरकारचा त्रिवार निषेध! निषेध!! निषेध!!!''**

कामगारांच्या युनियन करण्याच्या कलम १९ (१) (क) खालील 'घटनात्मक' अधिकाराची व 'आखरी रास्ता' म्हणून संघटितरित्या 'संप' करण्यासारख्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली केली जाऊन...काश्मिरी-दहशतवादापेक्षा खतरनाक असलेल्या 'कंपनी-दहशतवादा'ला (Corporate-Terrorism) अजून भयंकर ऊत येईल आणि त्यातून पुढे, कामाच्या ठिकाणी व्यवस्थापकांकडून 'बॉलिवूड'सारख्या महिलावर्गाच्या लैंगिक छळवणुकीला व शोषणाला थेट चालना मिळेल...

**'वैयक्तिक-करार' करण्याच्या 'फोडा-झोडी'च्या कामगारघातकी तरतुदीमुळे...कामगार-संघटनेच्या सशक्त माध्यमातून पगार-बोनसवाढीचे करार करणं, अशक्यप्राय होणार...**

कामगार-कर्मचारीवर्गाच्या 'कायमस्वरुपी' नेमणुका बंद होऊन, ठराविक काळाकरीता नेमलेले 'मुदतबंद-वेठबिगार', ही 'गुलामी-प्रथा' सुरु होणार (थोडक्यात, 'हायर अँड फायर' धोरण येणार) व त्यातूनच, सर्वच कामगारांचं 'माणूसपण' संपणार आणि त्यांचं कारखान्यातल्या कच्च्यामालासारखं 'वस्तूकरण' होणार...

तात्पुरती कामगार-कपात (Lay-offs), कायमची कामगार-कपात कायद्याने अगदी सहजसोपं होणार...

३०० हून कमी कामगार असलेल्या कंपन्या, एखाद्या नाक्यावरच्या पानठेल्यांसारख्या, सरकारी-पूर्वपरवानगीविनाच सहजी बंद करता येणार...

'गुलामी व नव-अस्पृश्यता'स्वरुप असलेल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'विरोधात न्यायालयीन लढा लढणं अशक्यप्राय होणार...

लढाऊ व प्रामाणिक कामगार-संघटनांची किरकोळ तांत्रिक सबबींखाली कायदेशीर असलेली 'मान्यता' रद्द करण्याचं भयंकर 'भांडवली-षडयंत्र'...

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

## 'धर्मराज्य पक्षा'तर्फे ठाण्यात '४ काळ्या कामगार-संहितां' विरोधात भव्य आक्रोश मोर्चा






***'यासारखे लढे कामगारांच्या हक्कांसाठी निर्णायक ठरणार असल्याने, महाराष्ट्रातील सर्व कामगारांनी 'धर्मराज्य पक्षा'च्या झेंड्याखाली एकत्र यावे'***
***- राजन राजे,***
***अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष***







# अमेरिका-इस्रायल-इराण शिमग्याचं कवित्व

**कोकणातील शिमगा (होळी) सणासारखीच 'सोंगं' नाचवत, आजवर अमेरिका जगावर आपलं अमानुष वर्चस्व गाजवत आलीय; सध्याचा अमेरिका-इस्रायलचा इराणवरील हल्ला, त्याच नितीशून्य 'लष्करी-दहशती'च्या परंपरेतला....**

मागील अंकावरुन पुढे भाग ११

## वस्तुतः, अमेरिकेचे अध्यक्ष आहेत 'बेंजामिन नेतन्याहू' आणि भारताचे पंतप्रधान आहेत 'डोनाल्ड ट्रंप'.... ''थँक्स् टू 'एपस्टिन-फाईल्स'!''

''आयुष्यात मी अनेक वाईट माणसांना भेटलोय; पण, डोनाल्ड ट्रंप एवढा वाईट, कुणी कधि भेटला नाही...त्यांच्या शरीरातील एकही पेशी सभ्य-सुसंस्कृत नसावी, इतका हा माणूस धोकादायक आहे!'', अमेरिकन अर्थखात्याचे तत्कालीन सचिव 'लॅरी सॅमर्स', यांना फेब्रुवारी-२०१७मध्ये लिहीलेल्या ईमेलमधलं जेफ्री एपस्टिनचं, अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रंपविषयीचं हे वक्तव्य!

आज हाच माणूस, आपल्या राजकीय-दादागिरीने, अवघ्या जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर खेचत घेऊन आलाय. ज्या इराणने, भारताप्रमाणेच, गेल्या कित्येक शतकात आपल्या सीमा लंघून, कधि कुणावर आक्रमण केलेलं नाही...त्याच इराणवर १८ व १९ व्या शतकात युरोपीय-वसाहतवादी आक्रमण झालं व त्यानंतर, इराणला १९८० मध्ये अमेरिकेसह पाश्चात्य राष्ट्रांच्या पाठबळावर, उद्दाम झालेल्या सद्दाम हुसेनच्या आक्रमणाचा (तब्बल १० लाख लोकांचे बळी देऊन) ८ वर्षे कडवा प्रतिकार करावा लागला...आणि, आता आपलं अस्तित्व वाचविण्यासाठी, त्याला जीवाच्या करारावर प्रतिकार करावा लागतोय; तो, कुठलंही ठोस कारण नसताना त्यावर झालेल्या अमेरिका-इस्रायलच्या भयंकर आक्रमणाचा!

डेव्हिड बेन गुरियन, गोल्डा मायर आदी झिओनिस्ट नेत्यांना हाताशी धरुन १४ मे-१९४८ सालच्या दहशत-दडपशाहीतून झालेल्या इस्रायल-राष्ट्राच्या निर्मितीतच, आजवरच्या आखाती-संघर्षाची बीजं पेरली गेलेली आहेत. 'FDR' या आद्याक्षरांनी ख्यातकीर्त असलेल्या अमेरिकेचे ३२ वे अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट, यांचा अकाली मृत्यू झाला नसता (ज्यांनी, जगभरातून इस्रायलमध्ये येणाऱ्या स्थलांतरित ज्यूंच्या संख्येवर 'मर्यादा' घालण्याचा इरादा जगजाहीर केला होता); तर, जसा आजवर न सुटलेला व भविष्यातही सुटण्याची फारशी आशा नसलेला; 'आखाती पेचप्रसंग' कदाचित निर्माणच झाला नसता... 'FDR' नंतरच्या हॅरी ट्रूमन यांनी, जाणिवपूर्वक घातलेल्या घोळामुळे सदरहू पेचप्रसंगाची तीव्रता उत्तरोत्तर वाढतच गेली; ती थेट आजतागायत. 'FDR'नंतरच्या अमेरिकी अध्यक्षांच्या पक्षपाती-धोरणांमुळे जगभरातील ज्यू-स्थलांतरितांच्या लोंढ्यांचा ओघ वाहता राहून इस्रायलची लोकसंख्या, पुढे दसपटीने वाढली व तेवढ्या प्रमाणात स्थानिक अरबी लोकांवरील नृशंस इस्रायली-अत्याचार वाढले.

संतापजनक व अस्वस्थ करणारी बाब ही की, बहुसंख्य अमेरिकन प्रसारमाध्यमं (इलेक्ट्रॉनिक व प्रिंट), ही इस्रायलची राजधानी 'तेल अव्हीव'मध्ये स्थित असूनही...त्या इतिहासाबाबत किंवा आज इस्रायलकरवी सुरु असलेल्या इराणी-विध्वंसावर ब्र देखील काढत नाहीत! आपल्याकडे 'अदानी-अंबानी', हे बडे भांडवलदार, बातम्या दाबण्याचं व खोट्या बातम्या प्रसारित करण्याचं, त्यांच्या मालकीच्या 'गोदी-मिडीया'तून, जे 'पापकर्म' करतायत (अशा अनेकोनेक पापकर्मांमुळेच, आपली 'निहीत पापं' धुण्यासाठी, त्यांना 'लालबागच्या राजा'सारख्या 'देव आणि देवस्थानां'ची अवडंबरं माजवण्याची मानसिक-गरज भासते); तेच महापातक, अमेरिकन व इस्रायली प्रसारमाध्यमं (Mainstream Media) चालवणारी 'झिओनिस्ट-लॉबी' करत असते! आपल्याकडचे 'गोदी-मिडीया'बाज पत्रकार किंवा अक्षयकुमारसारखा अर्धवट अकलेचा 'अंधभक्त' सिनेनट, जसे नरेंद्र मोदींना 'फुलटॉस' टाकल्यासारखे हलकेफुलके प्रश्न विचारतो; तसलेच, 'दुटप्पी-उद्योग', ही अमेरिकी, कॅनडियन किंवा ब्रिटीश प्रसारमाध्यमं...आजवर करत आलीयत. त्यांनी इस्रायली-प्रवक्त्यांना....

१) इस्रायल, आपल्याकडील अणुप्रकल्पांना IAEA च्या देखरेखीखाली का आणत नाही? २) इराण, हा NPT करारावर सही करणारा देश असताना; इस्रायल, तसं का करत नाही? ३) इस्रायलची अण्वस्त्र-सज्जता किती? ४) मग, इराणसारख्या देशांच्या आण्विक-विकासावर आक्षेप घेण्याचा, प्रतिबंध लादण्याचा इस्रायलला कुठला अधिकार? ५) इराणसारख्या देशांच्या विरोधात युनोच्या सुरक्षापरिषदेने संमत केलेल्या ठरावांबाबत सातत्याने बोचरी टीका करणाऱ्या इस्रायलच्या, आण्विक-विकास कार्यक्रमाविरोधात संमत झालेल्या ठराव क्र. ४८७ चं काय?

...अशातऱ्हेचे, अडचणीत टाकणारे व इस्रायली-मुखवटे टराटरा फाडून टाकणारे प्रश्न, कधिही विचारले नाहीत!

...बाय द वे, इस्रायलविषयी अमेरिकन गोऱ्या लोकांना, एवढं पराकोटीचं ममत्व असेल आणि तिथली, अफाट 'भांडवली-माया' गोळा केलेली 'झिओनिस्ट-लॉबी' फार प्रभावशाली होती व आहे; तर, वादग्रस्त पॅलेस्टाईन-भूमी सांभाळण्याबाबत 'राष्ट्रसंघा'ने (League Of Nations) ब्रिटनला दिलेला आदेश (British-mandated Palestine) वा अधिकार समाप्त होतानाच...वर्ष-१९४८ ला, पॅलेस्टाईनमधील ७ लाख स्थानिक अरब लोकांचं क्रौर्यपूर्ण विस्थापन करुन इस्रायलची निर्मिती करण्याऐवजी, ज्यू-लोकांसाठी म्हणून एक 'छोटेखानी इस्रायल राष्ट्र'... पॅलेस्टाईनी वाळवंटाऐवजी, अमेरिकेच्याच 'अवाढव्य' भौगोलिक-पोटातून त्यांनी जन्माला घालायला, काय हरकत होती (तसंही, जेरुसलेम, हे पवित्र-स्थळ १९६७ नंतर 'de facto' इस्रायलने बळकावले असले; तरी १९४८ नंतर, त्यावर 'युनो'चा अंकुश असल्याने, ज्यू लोकांना ते कायम उपलब्ध होतंच की)...???

...त्यांना, कॅनडाला ५१ वे राज्य म्हणून अमेरिकेच्या पोटात सामावून घेण्याचा, पनामा-कालव्यावर ताबा प्रस्थापित करण्याचा किंवा ग्रीनलँड बळकावण्याचा 'ट्रंपकृत' अविचार सुचू शकतो...मग, हेच का कधि सुचलं नाही?

भाग १२

## ''जब तक 'बसंती' नाचेगी...''च्या धर्तीवर, इस्रायलची युद्धे चालू रहातील; तोपर्यंतच, नेतन्याहू नावाचा 'सैतान' मोकाट राहू शकेल....

---

...जसे, आपल्याकडचे 'ढोंगी हिंदुत्ववादी' भाजपाई-संघीय लोकं, मुस्लिम लोकसंख्या-विस्फोटाचा वादग्रस्त प्रचार करत (विशेष बाब ही की, इराणच्या मुस्लिम-लोकसंख्यावाढीचा केवळ १.०८ ते १.२ टक्क्याच्या आसपास घुटमळणारा दर, आपल्याकडच्या हिंदू-लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा खूपच कमी भरेल)...भोळसट हिंदुंच्या नजरेत, 'मुसलमानां'ना अवास्तव 'शत्रू' बनवत आलेत आणि हिंदुराष्ट्राच्या फसव्या संकल्पनेतून बेगडी मतं व राजकीय-सत्ता मिळवत आलेत; तसाचं, हा इस्रायलचा 'नेतन्याहू' नावाचा सैतान, ''इस्रायलच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्याची'' (Existential Threat') आवई उठवून गेली २० वर्षे सत्ता भोगतोय...प्रचंड आर्थिक-घोटाळे करत, भ्रष्टाचाराच्या वाममार्गाने अफाट माया गोळा करतोय...आणि, त्याबद्दल झालेल्या न्यायालयीन शिक्षेपासून सुटका मिळवण्यासाठी, 'युद्ध' नावाचा अमानुष खेळ सतत खेळतोय...गाझापट्टीत वंशविच्छेद करु पहाणारा नरसंहार (Genocide) घडवतोय! ''जब तक 'बसंती' नाचेगी; वीरु की साँसे चलेगी'' या 'शोले'मधील 'सलीम-जावेद' संवादाच्या धर्तीवर, जोपर्यंत इस्रायलची युद्धे चालू रहातील; तोपर्यंतच, नेतन्याहू मोकाट राहू शकेल... युद्धे संपली की, हा नराधम युद्ध-गुन्हेगार गजाआड झालेला दिसेल!

''सुरुवातीची 'झिओनिस्ट-चळवळ', ही समाजवादी विचारसरणीची व आर्थिक-समानतेचा आग्रह धरणारी होती''...असा दावा, याकोव्ह रॅबकिन (Yakov Rabkin) आपल्या 'Zeonism Decoded', या नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकात करताना म्हणतात, ''नेतन्याहूसारख्या इस्रायलमधील काही नृशंस-नितीशून्य लोकांनी तिला अचानक उजवं व हिंसक वळणं दिलं; ज्यामुळे, उत्तर अमेरिकेतील असंख्य लोकं इस्रायलवर अगोदरच प्रचंड नाराज आहेत.''

'जोएल मार्टिन रुबिन'सारखे मध्यपूर्वेच्या घडामोडींवरील अमेरिकन भाष्यकार जरी, ''हे अमेरिकेचे युद्ध नसून, इस्रायलने अमेरिकेवर लादलेलं युद्ध आहे...असा अपप्रचार म्हणजे, निव्वळ ज्यू-विद्वेषी (Anti-Semitism) जनभावना आहे'', असं म्हणत असले; तरी, ''नेतन्याहू नसते तर, अमेरिकेने हे युद्ध पुकारलं असतं का; या प्रश्नातच, सगळ्याचं उत्तर साररुपाने दडलेलं आहे...ओबामा अध्यक्ष असण्यापासूनच अनेक दशके, नेतन्याहूंना, हा 'इराण-युद्धज्वर' जडलेला होता'' असं, बराक ओबामा यांचे राष्ट्रीय-सल्लागार 'बेन ऱ्होड्स' (Ben Rhodes) यांच्यासारख्या ...पृष्ठ क्र. ११ वर

# गोड साखरेचे कडवट कथानक



**गर्भाशय काढणाऱ्या ऊसतोड महिला कामगार !**

Cultination या फ्रान्समधील टॉपच्या मिडीया आऊटलेटने फोटो टाकून बीडमधील ऊसतोड मजूर महिलांबद्दलपोस्ट केली आहे, जी आतापर्यंत ८० लाख लोकांनी बघितली आहे.

गंमत बघा, देशातील एकाही न्यूज चॅनेलला, वेब पोर्टलला, राज्यातील लीडिंग चॅनेल आणि पत्रकारांना हा प्रश्न दिसला नाही, महत्त्वाचा वाटला नाही. यांवर हजारो किमी दूर बसलेल्या एका पोर्टलने आवाज उठवला.

**तर हा संबंधित वृत्तांत वाचा !**

२०२४ मध्ये भारतातील बीड जिल्ह्यात ८४३ महिलांनी ऊसतोडीसाठी जाण्याच्या अगोदर गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करून घेतली. त्यापैकी ४७७ महिला या ३० ते ३५ वयोगटातील होत्या. ही माहिती महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य सर्वेक्षणातून समोर आली असून, तो अहवाल जून २०२५ मध्ये प्रकाशित झाला.

या शस्त्रक्रियांचा संबंध थेट पैशांशी आहे. बीडमध्ये एक पुरुष आणि त्याची पत्नी मिळून कोयता म्हणून कामासाठी नोंदणी करतात. हे नाव ते वापरत असलेल्या अवजारावरून पडले आहे. मुकादम नावाचा मध्यस्थ त्यांना सहा महिन्यांच्या ऊसतोड हंगामासाठी ५० ते ६० हजार रुपयांची आगाऊ रक्कम देतो. त्या बदल्यात त्या दाम्पत्याला दररोज तब्बल दोन टन ऊस तोडून ट्रकमध्ये भरावा लागतो. हे काम दिवसाला १२ ते १४ तास चालते आणि आठवड्यात एकही सुट्टी नसते.

मुकादम आगाऊ रकमेपैकी १५ ते २५ टक्के हिस्सा घेतो, शिवाय जोडप्याच्या कमाईतील आणखी रक्कम स्वतःकडे ठेवतो. एखादा दिवस काम चुकल्यास २५० ते ५०० रुपयांचा दंड आकारला जातो. एखाद्या महिलेला मासिक पाळीदरम्यान त्रासामुळे एक दिवस सुट्टी घ्यावी लागली, तर तिच्या जवळपास आठवडाभराच्या हातात येणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होतो. त्यामुळे मासिक पाळीची झंझट संपवण्यासाठी थेट गर्भाशय पिशवीच काढून टाकली जाते.

ऊस खरेदी करणाऱ्या साखर कारखान्यांची या सगळ्या प्रक्रियेशी कायदेशीरदृष्ट्या थेट जोड नसते. कारखाना फक्त साखर विकतो. महाराष्ट्रात २१० साखर कारखाने आहेत आणि २०२५-२६ हंगामात जवळपास १ कोटी टन साखर उत्पादन होण्याचा अंदाज आहे. ही साखर खरेदी करणाऱ्यांमध्ये Coca-Cola, PepsiCo, Mondelez (ज्यांच्या मालकीचा Cadbury ब्रँड आहे) आणि Unilever यांचा समावेश आहे.

२०२४ मध्ये The New York Times आणि The Fuller Project यांच्या संयुक्त तपासात या पुरवठा साखळीचा मागोवा घेतला गेला. या तपासात दोन मोठ्या साखर कंपन्यांचा उल्लेख झाला Dalmia Bharat Sugar आणि NSL Sugars! या कंपन्या अशा साखर कारखान्यांना ऊस पुरवत होत्या, ज्यांच्याकडे उद्योगातील प्रमुख नैतिक प्रमाणपत्र Bonsucro होते. मात्र, त्या संस्थेच्या तपासणीत हे काहीच उघड झाले नाही. जे काही ऑडिटमध्ये सापडले नाही, ते न्यूयॉर्क टाइम्सच्या तपासाने काही महिन्यांत उघड केले.

२०१९ मध्ये सरकारी चौकशीत बीडमधील ८२,३०९ महिला ऊसतोड मजुरांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी १३,८६१ महिलांचे म्हणजे जवळपास १७ टक्के गर्भाशय काढण्यात आले होते. २०२४ मध्ये IIED या आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थेने बीडमधील ४२३ कुटुंबांचा अधिक सखोल अभ्यास केला. ज्या कुटुंबांतील महिला ऊसतोडीसाठी स्थलांतरित झाल्या होत्या, त्यापैकी ५५.७३ टक्के महिलांची गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया झाली होती. ज्या महिला गावातच राहिल्या, त्यांच्यात हा आकडा १७.०६ टक्के होता. तुलना म्हणून पाहिल्यास, भारतभर १५ ते ४९ वयोगटातील महिलांमध्ये गर्भाशय काढण्याचे राष्ट्रीय प्रमाण फक्त ३.२ टक्के आहे.

२०२४ मधील या बातम्यांनंतर काही हालचाली झाल्या. Mondelez ने शांतपणे Dalmia Bharat Sugar सोबतचे संबंध तोडले. Coca-Cola ने ४ साखर कारखान्यांत कामगार प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला, तर PepsiCo ने फेब्रुवारी २०२५ मध्ये भागधारकांच्या मतदानाला अमेरिकेतील एका नियमाचा आधार घेत रोखले. हा नियम कंपन्यांना त्यांच्या महसुलाच्या ५ टक्क्यांपेक्षा कमी व्यवसायाशी संबंधित मुद्द्यांवर मतदानातील सहभाग रोखण्यास मुभा देतो.

अमेरिकेच्या कामगार विभागाने बीडमधील साखरेचा समावेश जबरदस्तीच्या मजुरीतून तयार होणाऱ्या उत्पादनांच्या यादीत केला. महाराष्ट्र सरकारने २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुन्हा एक समिती स्थापन केली पहिली समिती स्थापन झाल्यानंतर तब्बल सात वर्षांनी!

या सात वर्षांत साखरेचे उत्पादन मात्र अखंड सुरूच राहिले. ज्या व्यवस्थेमुळे महिलांना गर्भाशय काढण्यास भाग पाडले जाते, तीच व्यवस्था बाजारातील शीतपेयांच्या डब्यांपर्यंत पोहोचणारी साखर निर्माण करते. आजही या दोन्ही गोष्टी नेमक्या त्याच पद्धतीने सुरू आहेत, जशा त्या सुरुवातीपासून उभ्या करण्यात आल्या होत्या.

***...आशिष मुनका***

*(प्रसारमाध्यमातून साभार...)*

---

**अमेरिका-इस्रायल-इराण शिमग्याचं कवित्व** ...पृष्ठ क्र. १० वरुन

अनेक जाणकारांचं ठाम प्रतिपादन आहे. त्यांचं प्रतिपादन इथेच थांबत नाही; तर, ''ट्रंप दावा करतात तसा, इराणकडे कुठलाही आण्विक-शस्त्रसज्जतेचा कार्यक्रम कधिच नव्हता किंवा त्यांची क्षेपणास्त्रे, ही अमेरिकेसाठी कधिच धोकादायक नव्हती; इराणच्या क्षेपणास्त्रांचा धोका फक्त, इस्रायललाच होता...म्हणूनच, ते अमेरिकेचे नव्हे, तर अमेरिकेवर नेतन्याहूंनी लादलेलं इस्रायलचं युद्ध आहे, ज्याला 'लिंडसे ग्रॅहॅम'सारख्या युद्धखोर (War Hawk) अमेरिकन सिनेट-सदस्यांचा पाठींबा आहे'', असं ते परखडपणे बजावतात.

कालपरवापर्यंत नेहरु-गांधींच्या काँग्रेसी आर्थिक-धोरणावर 'परमिट राज' म्हणून जहरी टीका करणाऱ्या भाजप-संघियांनी, आज भारतीय परराष्ट्र-धोरणाला 'अमेरिकन परमिट राज' बनवून टाकलंय... आणि, अमेरिकन संरक्षण-धोरण, हे अमेरिकेचं नव्हे; तर, इस्रायलचं संरक्षणात्मक धोरण बनलंय! थोडक्यात, अमेरिकेचे अध्यक्ष 'बेंजामिन नेतन्याहू' आणि भारताचे पंतप्रधान (खरंतरं, भारताचे गव्हर्नर जनरल) 'डोनाल्ड ट्रंप'...अशी आज 'एपस्टिन-फाईल्स'मुळे नवी 'आंतरराष्ट्रीय श्रम-विभागणी' झालीय!

...बाय द् वे, दोन लंगोटीयार दोस्तांपैकी एक (अमेरिकेतला) उठसूठ पत्रकार परिषदा घेण्यात सध्या दंग आहे; तर, दुसरा (भारतातला) पत्रकार-परिषदचं नव्हे; तर, थेट पत्रकारांपासूनच दूर पळ काढण्यात दंग...बात ये है कि, ''एक 'विश्वगुरु' नव्हे; तर, नेसूचं सोडून डोक्याला गुंडाळलेला, एक निलाजरा 'मौनीबाबा' भारतात अवतरलाय आणि ते दुःसह चित्र, उभं जग पहातंय''!

***...राजन राजे,***

अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष

# ग्रेट निकोबार प्रकल्प : विकासाच्या नावाखाली निसर्गहत्या?

**विरोधी पक्षनेता राहुल गांधी याने निकोबार बेटाला भेट दिल्यावर अंदमान-निकोबारच्या बंदर प्रकल्पाबद्दल कळले आणि थोडा अभ्यास केला.**

थोडक्यात हे कळाले की:

- अंदमान आणि निकोबार बेटांच्या अतिसंवेदनशील परिसरात सुमारे ७२,००० कोटी रुपयांचा हा अजस्र प्रकल्प राबवला जात असून, यात आंतरराष्ट्रीय ट्रान्सशिपमेंट टर्मिनल आणि विमानतळाचा समावेश आहे.
- या विकासकामांमुळे निकोबारमधील १३० चौरस किलोमीटरचे अतिशय घनदाट सदाहरित अरण्य कायमचे नष्ट होणार असून, जवळपास १० लाख झाडे तोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- सर्वोच्च न्यायालयाच्या तज्ज्ञ समितीनुसार, एका मोठ्या झाडाचे वार्षिक पर्यावरणीय मूल्य सुमारे ७४,५०० रुपये असते. या हिशोबाने १० लाख झाडांची ५० वर्षांची किंमत लाखो कोटींच्या घरात जाते, जी या प्रकल्पाच्या एकूण खर्चापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे.
- तरीदेखील, 'हस्तक्षेप करण्यास ठोस कारण नाही', असे म्हणत राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) अंदमान-निकोबार बंदर प्रकल्पाला मंजुरी दिली आहे.
- हा भाग 'बायोस्फीअर रिझर्व्ह' असतानाही, केवळ सामरिक महत्त्वाचा बागुलबुवा उभा करून, जायंट लेदरबॅक कासव आणि निकोबार मेगापॉड यांसारख्या दुर्मिळ प्रजातींचे नैसर्गिक अधिवास उद्ध्वस्त केले जात आहेत.
- जगातील मानववंशशास्त्रज्ञांनी या प्रकल्पाला शोम्पेन आदिवासींसाठी 'मृत्यूचे फर्मान' म्हटले आहे. शेकडो वर्षांपासून बाह्य जगाशी संपर्क नसलेल्या या आदिम जमातींचे नैसर्गिक कवच हिरावून घेऊन त्यांना विनाशाच्या खाईत लोटले जात आहे.
- आर्थिक आणि सामरिक प्रगतीची स्वप्ने दाखवून निसर्गाची ही कत्तल करणे म्हणजे भविष्यातील महाभयंकर पर्यावरणीय संकटाची सुरुवात आहे. विशेष म्हणजे, या प्रगतीची कोणतीही शाश्वती नाही. भारताच्या मुख्य भूमीपासून हजारो किलोमीटर दूर आणि सिंगापूर-कोलंबोसारख्या प्रस्थापित बंदरांच्या स्पर्धेत असलेल्या या प्रकल्पापासून नेमके कोणते व्यापारी फायदे मिळतील, हे कोडेच आहे.

पण भोंदू राष्ट्रवादाने पोखरलेला आणि हिंदुत्वाने पिसाळलेला समाज पर्यावरणाची कशाला बरे चिंता करेल?

***...चित्तरंजन भट्ट***

*(ता. क. : 'मध्य भारताची फुफ्फुसे' म्हणून गणल्या गेलेल्या छत्तीसगडच्या सरगुजा-कोरबा जंगलातील जवळपास २ लाख झाडं अदानी-कंपनीच्या खाणकामासाठी...ग्रेट निकोबारला शेकडो वर्षे जुने ७५-९० लाख 'पुराणवृक्ष')* गौतम अदानीकृत एपस्टिन-फाईलसच्या धर्तीवरील संभाव्य 'ग्रेट निकोबार-फाईल्स'सदृश्य धनिकबाळांच्या उच्छृंखल मौजमजेसाठी... नाशिकला तीन हजार मोठमोठे वृक्ष, 'कुंभमेळा' नावाच्या तथाकथित हिंदुत्ववाद्यांच्या 'दंभमेळ्या'साठी...मुंबईचं फुफ्फुस असलेलं आरे-कॉलनीतलं अवघं जंगल, मुंबई मेट्रो-कारशेड म्हणजेच, धनदांडग्या-माजोर जैन-गुज्जू-मारवाडी भांडवलदारांच्या 'बुलेट-ट्रेन'च्या हव्यासासाठी... शिवाय, नितीन गडकरींच्या 'कार्बनकेंद्री' महामार्गांच्या 'अर्थपूर्ण' महाजालासाठी प्राथमिक अंदाजानुसार ५-१० कोटी झाडं, नव्हे डेरेदार वृक्ष, तोडले गेले आहेत किंवा तोडले जाणार आहेत... फार जास्त नव्हे हो, हा आकडा...अजून बरीच 'भाजप-संघ'प्रणित वृक्षतोड बाकीच आहे! तेव्हा नीट ध्यानात घ्या; पुढील पिढ्यांच्या पुढ्यात...अंधाराचं ताट वाढून ठेवणाऱ्या, या एकूण विनाशकारी घटनाक्रमालाच 'विकास' म्हणायचा, बरं का बेगडी-बनावट हिंदुत्ववाद्यांनो...!!!

---

## मध्य आशियातील भारताची मूक माघार?

कोणतीही पत्रकार परिषद नाही, कोणताही निरोप समारंभ नाही आणि माध्यमांचे कोणतेही वार्तांकन नाही.

त्या जागतिक नेत्याने शांतपणे आपल्या बॅगा भरल्या आणि एका रात्री शांतपणे परतले. प्रत्येक लहान यशाचा डंका पिटणाऱ्या त्या महान व्यक्तीने, आपल्या दोन दशकांच्या कठोर परिश्रमांना आणि राजनैतिक भांडवलाला एकही शब्द न बोलता गाडून टाकले.

**वर्ष २००२. ताजिकिस्तानची भूमी आणि भारताचे सामरिक स्वप्न.**

दुशानबेच्या अगदी पश्चिमेला, आम्ही आमचा पहिला परदेशी लष्करी तळ, अयनी हवाई तळ, बांधायला सुरुवात केली. सुमारे ८० ते १०० दशलक्ष डॉलर्सची प्रचंड गुंतवणूक, जी २० वर्षे चालली. भारताचा एकमेव परदेशी लष्करी तळ ताजिकिस्तानमधील फरखोर येथून येथे हलवण्यात आला होता.

ही ३,२०० मीटर लांबीची धावपट्टी आहे, जिथून आमची सी-१७ ग्लोबमास्टर आणि सुखोई एसयू-३० लढाऊ विमाने आकाशात झेप घेऊ शकत होती.

**त्याचे भौगोलिक महत्त्व समजून घ्या :**

तो अफगाणिस्तानच्या वाखान कॉरिडॉरपासून फक्त २० किलोमीटर अंतरावर होता. तोच अरुंद पट्टा, जो एकाच वेळी पाकिस्तान-व्याप्त काश्मीर (**PoK**) आणि चीनच्या शिनजियांगला लागून होता. तिथून, आम्ही पाकिस्तान आणि चीन या दोघांच्याही हालचाली एका दृष्टिक्षेपात ओळखू शकत होतो.

पाकिस्तानी भूभागाला स्पर्श न करता किंवा कोणाकडेही याचना न करता, आम्ही मध्य आशिया आणि अफगाणिस्तानमध्ये आमचे अस्तित्व प्रस्थापित करू शकलो असतो. हे एका स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचे स्वप्न होते.

**पण मग आले २०२२.**

आम्ही कोणालाही न कळवता शांतपणे तळ रिकामा केला आणि ताजिकिस्तानच्या हाती सूत्रे सोपवली. हे सत्य तीन वर्षे राष्ट्रापासून लपवून ठेवण्यात आले, अखेरीस २०२५ च्या अखेरीस ते दबक्या आवाजात मान्य करण्यात आले.

का? आमच्याकडून काही चूक झाली का? नाही.

रशिया आणि चीनने फक्त दुशानबेवर दबाव आणला. रशिया हा प्रदेश आपला अंगण मानतो, आणि चीन तिथे अफगाण सीमेजवळ सुरक्षा चौक्या उभारत आहे. त्यापैकी कोणालाही आपल्या प्रभावक्षेत्रात कोणत्याही बाह्य शक्तीने प्रवेश करावा असे वाटत नव्हते.

रशिया आमचा सामरिक भागीदार आहे, आणि चीन एक असा प्रतिस्पर्धी आहे, ज्याला थेट चिथावणी देण्याचा धोका आम्ही पत्करू इच्छित नाही. हा दबाव सहन करण्याची ताकद आमच्यात नव्हती.

**मग आम्ही काय केले?**

आम्ही शांतपणे आमचं सामान भरलं आणि घरी परतलो. २०२३ च्या सुरुवातीपर्यंत, रशियन सैन्याने तोच अयनी तळ ताब्यात घेतला होता. जे आम्ही आमच्या घामाने आणि पैशाने उभारले होते, ते रशियाने एकही गोळी न झाडता वारसा म्हणून मिळवले.

**थांबा, या कथेची शोकांतिका इथेच संपत नाही.**

२६ एप्रिल रोजी, चाबहार बंदरही शरणागती पत्करण्यात आले. चाबहार, ज्याला आम्ही २३ वर्षे इराण, अफगाणिस्तान आणि मध्य आशियाचे प्रवेशद्वार म्हणून जपले होते, ते अमेरिकेच्या निर्बंधांच्या दबावाखाली एका इराणी संस्थेच्या हवाली करण्यात आले.

जरा कल्पना करा... अयनी तळ २०२२ मध्ये गेला, आणि चाबहार २०२६ मध्ये. मध्य आशियातील आमचे दोन सर्वात मोठे सामरिक आधारस्तंभ. एक रशिया आणि चीनच्या दबावामुळे उखडला गेला, तर दुसरा अमेरिकेच्या निर्बंधांनी गिळंकृत केला. अवघ्या चार वर्षांत, आपली दशकांची काटकसर व्यर्थ ठरली.

ताजिकिस्तानमध्ये फरखोर नावाचा आणखी एक हवाई तळ आहे. २००८ च्या सुमारास फरखोर तळ बंद केल्यानंतर, भारताने अयनी हवाई तळ विकसित केला, जो त्याचा दुसरा परदेशी लष्करी तळ बनला. पण अयनीनंतर भारताचा परदेशात एकही हवाई तळ नाही. पाकिस्तानची नजर आता फरखोरवर आहे. तत्काळ तिथूनही बातमी येईल.

आपण मध्य आशिया एकाच झटक्यात गमावत नाही आहोत. आपण तो हप्त्यांमध्ये, अगदी शांतपणे गमावत आहोत. एका वेळी एक लष्करी तळ, एका वेळी एक बंदर.

जेव्हा धोरणे केवळ घोषणांपुरती मर्यादित राहतात, तेव्हा जमिनीवरील वास्तव आपले क्रूर रंग दाखवते. एखाद्या राष्ट्राची खरी ताकद त्याच्या देशांतर्गत गदारोळात नसते, तर जगाच्या डोळ्यात डोळे घालून आपले स्थान टिकवून ठेवण्याच्या त्याच्या मूक धैर्यात असते.

अरेरे! आपण आपल्याच देशात जागतिक नेते बनल्याचा उत्सव साजरा करत असतानाच, आपल्या सर्वात मौल्यवान सामरिक भूमी जागतिक नकाशावरून शांतपणे नाहीशा होत होत्या.

आणि सर्वात दुःखद आणि भीतीदायक गोष्ट ही आहे की, राष्ट्राच्या या मूक पराभवाबद्दल कोणीही चकार शब्द काढत नाहीये.

*- दत्ता देसाई*

# ढोंगी-भोंदूंची शिवराय भक्ती

... ज्ञानेश महाराव (ज्येष्ठ पत्रकार - संपादक)

**शिवरायांना रामदासांपुढे झुकवणारा बागेश्वर बाबा असो; किंवा माथेफिरू आमदार संजय गायकवाड असो; त्याचेही विदेशी लेखक जेम्स लेन सारखेच झाले आहेत. ते ''वाहक'' आहेत. त्यांचे ''बोलविते धनी'' कोण, ते ओळखा.**

थोर विचारवंत अँतोनिओ ग्राम्सी (इटाली, जन्म : २२ जाने.१८९१; मृत्यू: २७ एप्रिल १९३७) याने म्हटलंय की, ''एखाद्या समाजाला नियंत्रित करून त्यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी इतिहासाचा वापर केला जातो!'' ह्या प्रक्रियेला ग्राम्सी यांनी 'हेजिमनी' (धुरिणत्व) अशी संज्ञा दिलीय. या संज्ञेच्या कसोटीवर चुकीच्या इतिहासाला आणि वर्तमानाला तपासले की, समाज गुलाम कसा बनतो, ते स्पष्ट होते. ह्याच कसोटीवर आमदार संजय गायकवाड आणि धीरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर बाबा ह्यांच्या आगाऊ प्रकरणांची तपासणी केली पाहिजे.

बुलडाण्याचे शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांनी कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित ''शिवाजी कोण होता?'' ह्या पुस्तकाच्या शीर्षकाच्या निमित्ताने आपल्या बेशरमपणाचे जे प्रदर्शन घडवले, ते संतापजनक ठरले आहे. पानसरे ह्यांचे हे पुस्तक १९८९ मध्ये, म्हणजे ३७ वर्षांपूर्वी प्रकाशित झालंय. त्यातील आणि मुखपृष्ठावरील छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या एकेरी उल्लेखाने आमदारसाहेबाचं माथं भडकलं. त्यांनी पुस्तकाचा तरुण प्रकाशक प्रशांत आंबी याला रातोरात फोन केला; आणि तोंडाचं संडास करून त्याच्यावर कोसळले. ''शिवछत्रपती आज असते तर..'' त्यांनी लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीला कलंक फासणाऱ्या ह्या वर्तनाबद्दल संजय गायकवाड यांना ''हिरकणी टोक'' दाखवले असते. इतकी बेताल भाषा संजय गायकवाड यांनी वापरली आहे.

संजय गायकवाड यांचा फोनवरचा शिवराळ हैदोस, हा शिवाजी राजांच्या एकेरी उल्लेखाचा संताप होता. तथापि, असा एकेरी उल्लेख यापूर्वी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, प्रबोधनकार ठाकरे (दगलबाज शिवाजी), गोळवलकर गुरुजी (विचारधन), सावरकर (सहा सोनेरी पाने), इतिहासकार त्र्यं. शं. शेजवलकर, अलीकडेच निधन पावलेले ''शिवचरित्र''कार गजानन मेहेंदळे यांच्यासह अनेक इतिहास अभ्यासकांच्या लेखनातून; शाहिरांच्या पवाड्यातून; कवी-गीतकारांच्या गाण्यातून आला आहे. ह्यात अनादर नाही. ह्याबद्दल गोविंद पानसरे यांनी आपले म्हणणे मांडले आहे. तसेच, ते गजानन मेहेंदळे यांनी प्रस्तावनेत सविस्तर लिहिले आहे. असे काही वाचणे-ऐकणे आणि मगच व्यक्त होणे, हे संजय गायकवाड यांना माहिती असण्याची शक्यता नसावी, ह्याची साक्षच त्यांनी दिलीय. ती गुलामगिरीची आहे.

नागपुरातही हेच घडले. दुर्गादेवी मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी सरसंघचालक मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह धीरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर धाम उपस्थित होते. ह्यावेळी केलेल्या भाषणात - ''वारंवारच्या युद्धाने थकलेल्या शिवरायांनी आपला जिरेटोप रामदास स्वामींच्या पायाशी ठेवला आणि वैराग्य जाहीर केले. तेव्हा रामदासांनी गुरू म्हणून शिवरायांना कर्तव्याची जाणीव करून दिली आणि जिरेटोप त्यांच्या माथ्यावर ठेवला!'' असं बागेश्वर बाबा बरळला. त्याच बरोबर त्याचा ''पर्ची फेम दिव्य दृष्टीचा बनाव''ही उघडा पडला. कारण असे काही बोलल्यावर आपली आणि आपल्याकडून असे वदवून घेणाऱ्यांची महाराष्ट्रात काय बेइज्जत होईल, ह्याचा अंदाज त्याच्या बोगस दिव्यदृष्टीला आला नाही. परिणामी, जे व्हायचे ते झाले. भोंदू बागेश्वरला माफी मागावी लागली.

मात्र, ह्यात त्याची चुकी नव्हती. त्याने जसे वाचले-ऐकले ते तो बोलला. रामदास स्वामी यांचे भक्तीतून समाजाला शक्ती देण्याचं कार्य ऐतिहासिक आहे. लेखनात मराठी भाषेचे अत्युत्तम सौंदर्य आणि सौष्ठव आहे. त्यातील गुणवर्णनाला जातीच्या मर्यादा आहेत. पण त्यांनी कुठेही ''शिवाजीराजे माझे शिष्य आहेत / होते,'' असे म्हटलेलं नाही. त्या त्यांच्या पश्चात वर्णवर्चस्व लादू पाहणाऱ्यांच्या लबाड लेखनउड्या आहेत. त्यातून ''शिवरायांनी रामदासांच्या झोळीत स्वराज्य टाकले!'', ''शिष्य परीक्षा घेण्यासाठी स्वामींनी शिवरायांना वाघिणीचे दूध आणण्याची आज्ञा केली'', अशा भाकडकथा रामदासींकडून रचण्यात आल्या. रामदास म्हणजे मारुती - बजरंग! हे थोतांड पक्के करण्यासाठी रामदासांना छोटे शेपूटही लावण्यात आलं. ह्या कथा आणि बनावट पत्र-सनदा ''रामदासांना शिवरायांचे गुरू'' करण्यासाठी वापरण्यात आल्या. त्या खोट्या ठरल्या आणि त्यातून उसळलेल्या वादात रामदास स्वामींची नाहक बदनामी झाली.

रामदास-कोंडदेवच्या गुरुत्वाचा हा भटी बनाव न. र. फाटक, त्र्यं .शं. शेजवलकर, वा.सी. बेंद्रे, सेतुमाधव पगडी यांच्यासारख्या खऱ्या ब्राह्मणांनी उघड्यावर आणला, हे विशेष! तरीही हा खोटेपणा थांबला नाही. तो मराठीतून इतर भाषांत गेला. बलात्काराच्या आरोपाखाली जेलबंद झालेला आसाराम बापू ह्याच्या सत्संगाच्या ''ऋषी प्रसाद'' ह्या हिंदी मासिकातून शिवराय-रामदासाच्या खोट्या कथांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झालाय. त्याचा लाभ घेण्यासाठी २०१२ च्या गुजरात आणि मध्य प्रदेश विधानसभा निवडणूक प्रचारात ''भाजप''ने ''शिवराय-रामदास भेटीचे पोस्टर'' वापरले. ह्या आधारेच भोंदू बागेश्वर बोलला. ही वस्तुस्थिती असली तरी नागपूरच्या कार्यक्रमात त्याला जाणीवपूर्वक बोलण्यास भाग पाडलं असावं. ''रामदास बिना शिवाजी नहीं'' असं बोलणाऱ्या (तेव्हा राज्यपाल असलेल्या) भगतसिंग कोश्यारी यांच्यावरील प्रचंड टीका प्रकरण फार जुने नसताना; बागेश्वर बाबानेही तसेच शेण खाणे, ह्यात योगायोग नाही. निश्चित योजकता आहे.

अशाच प्रकारे लोकजागृतीचा अंदाज घेत २००३ मध्ये विदेशी लेखक जेम्स लेन याच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ आणि शिवाजीराजे यांच्या चरित्राची विटंबना करण्याचा प्रकार घडला. ह्यासाठी रामदास स्वामी आणि दादोजी कोंडदेव यांच्या गुरुत्वाचा वापर करण्यात आला. त्यांच्या माध्यमातून शिवरायांच्या जन्मदात्याबद्दल प्रश्न निर्माण करण्याचा नीच, कुटिल डाव खेळण्यात आला. तो पुणेरी ब्राह्मणी टोळक्याचा 'डार्लिंग' असणारा विदेशी संशोधक-लेखक जेम्स लेन याने उघड्यावर आणला. जी खाजगीत कुजबुज चालायची, ती त्याने ''शिवाजी : द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया'' ह्या पुस्तकात छापली. जेम्स लेन हा वाहक होता. त्याच्या माध्यमातून जिजाऊ-शिवरायांच्या चरित्राला 'अफजुलखानी डंख' अट्टल 'कोब्रा' नागांनी मारला होता. ह्या हरामखोरीचा मी ''साप्ताहिक चित्रलेखा''च्या संपादकीयातून (अंक : २२ डिसेंबर २००३) कठोर शब्दांत वेळीच समाचार घेतला होता. त्याने अस्सल मावळे जागे झाले. 'संभाजी ब्रिगेड'च्या बॅनरखाली एकवटले आणि त्यांनी जेम्स लेनला तीन वर्षे पाहुणचार देणाऱ्या पुण्यातल्या 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थे'वर हल्ला केला. हा हल्ला समर्थनीय नव्हता. पण तो का झाला, ह्याची चिकित्सा होणे आवश्यक होते. ती चिकित्सा मी तेव्हा आणि त्यानंतरही शिवचरित्राची छेडछाड करण्याचे प्रकार झाले; त्या प्रत्येक वेळी केली. त्यामुळे लोकजागृती झाली. सनातनी हरामखोरीची चिरफाड करणारे लेखन मोठ्या प्रमाणात प्रकाशित झालं. त्यामुळे छत्रपतींच्या गाद्या सांभाळणाऱ्यांनाही आपल्या जबाबदारीचं भान आलं. परिणामी, बागेश्वरच्या भोंदूगिरीविरोधात जसा आवाज उठला, तसा आमदार संजय गायकवाड यांच्या हैदोसाविरोधातही उठला. पानसरे यांच्या पुस्तकाच्या लाखो प्रतींची यापूर्वीच विक्री झाली आहे. ह्या प्रकरणानंतर पुस्तकाची विक्री आणि मागणी वाढलीय.

तरीही, ''गायपट्टा''वाला स्वामी आनंद स्वरूप नाक वर करून म्हणतो, ''धीरेंद्र शास्त्री जे बोलले त्याचं मी समर्थन करतो. त्यांनी माफी मागायची गरज नव्हती. शिवाजींनी कधी मैदानात युद्ध लढलं नाही. ते फक्त छापामार युद्ध लढले. पेशव्यांनी युद्धाच्या मैदानात लढाई केली. युद्ध पेशवे लढलेले आणि नाव शिवाजीचं झालं!'' आता ह्याचा समाचार घेण्याच्या मोहिमेवर आमदार संजय गायकवाड जाणार का?... नाही जाणार! कारण, त्यातील विषारी प्रचार समजण्याइतकी अक्कल पाहिजे ना! असो. जेम्स लेन आला, बागेश्वर बाबा आणि आणि शिवचरित्राची नासधूस करून गेला असे झालेले नाही. इतिहासाचार्य राजवाडे, ब.मो. पुरंदरे, निनाद बेडेकर आदिंनी लेखनातून शहाजीराजांना सतत गैरहजर दाखवणे, रामदास-कोंडदेव हे 'गुरू' नसताना तसा उल्लेख करणे; कोंडदेवांना सतत शिवबा-जिजामाता यांच्या भोवती दाखवणे, असे उद्योग केले आहेत. पुरंदरेंनी तर त्यापुढे उडी मारून ''दादोजी, जिजामाता आणि शिवबा यांचे गोत्र एकच'' अशी विकृत कल्पना त्यांच्या शिवचरित्रात मांडलीय. त्याची चर्चा घडावी, ह्याच हेतूने देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री होताच ब.मो.पुरंदरे यांना 'महाराष्ट्रभूषण' (२०१५) पुरस्काराने सन्मानित करण्याचा घाट घातला आणि त्याला महाराष्ट्रभरातून विरोध होऊनही तो तडीस नेला. आताही देवेंद्र फडणवीस यांनी ''लोककथा म्हणजे इतिहास नाही,'' असं म्हणत भोंदू बागेश्वरची सुटका केलीय. अर्थात, 'नाशिकचे पोलीस आयुक्त छत्रपती आहेत का?' असे बोलणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडून वेगळी अपेक्षा करूच नये.

'संघ-भाजप'चे चालक शिवरायांचे नाव घेतात; पण प्रत्यक्षात त्यांच्या उलट विचाराचे काम करतात. त्यांना

शिवाजीराजे मतांचे ध्रुवीकरण करणाऱ्या दंगलींसाठी आणि सामाजिक वर्चस्वासाठी पाहिजेत. शिवरायांचे शेतकरीहित, स्त्री सन्मान, सामाजिक समता, उदार धार्मिक धोरण याच्याशी त्यांचे काहीही देणे-घेणे नाही. शिवरायांची नैतिकता आणि प्रगल्भता यांच्यात येणे शक्य नाही. कारण त्यांची ती वृत्तीच नाही; तसा संस्कारच नाही! ह्याची साक्ष ज्ञानोबा- तुकोबांच्या मानवतावादी विचारांपेक्षा 'मनुस्मृती'ला श्रेष्ठ म्हणणारा संभाजी भिडे तथा मनोहर कुलकर्णी वरचेवर देत असतो. अशांपासून विशेषत: बहुजन-मराठा समाजाने दूर राहायला हवं. त्यांना साथ देणे म्हणजे शिवरायांची बदनामी करणाऱ्यांना ताकद देण्यासारखे आहे. लोकशाहीची हत्या करणाऱ्यांना मदत करण्यासारखे आहे.

विद्यमान सरसंघचालक मोहन भागवत इतिहासाचे दाखले देत मुस्लिमांचा 'डीएनए' हिंदूच आहे, असे सांगताना; ब्राह्मणांनी प्रायश्चित्त घ्यावे, दलितांबरोबर 'स्नेहभोजन' करावे, अशी 'समरसता'वादी विधानंही करतात. पण त्याने इतिहास कसा बदलेल, ते मात्र सांगत नाहीत. खरं तर, वर्तमानातला व्यवहार बदलला की इतिहासही बदलतो. कारण आजचा वर्तमान हाच उद्याचा इतिहास असतो. तथापि, ओठात हिंदुत्व आणि पोटात ब्राह्मण्य असले की, शक्य असलेले बदलही घडत नाहीत. म्हणूनच ''महिला आरक्षण''च्या मुद्द्यावर ''भाजप आणि संघ परिवार''च्या संघटनांनी कितीही धिंगाणा घातला तरी त्यांना 'शंकराचार्य' वा 'सरसंघचालक' ह्या पदावर ''महिला का नाही'', ह्या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. त्याऐवजी बहुजन समाजाला नाउमेद करण्यासाठी त्यांच्या महापुरुषांची बदनामी करणारी वक्तव्यं करणे, महिलांचे चारित्र्यहनन करणारे 'जोक्स' तयार करणे, हे उद्योग सातत्याने सुरू ठेवणे, त्यांना हातखंडा सनातनी धंदा असल्यासारखे जमते. हे पुराण-पोथ्यांचे दाखले देत सुरू असते. ह्या हरामखोरीला थेटपणे लाथाडायचं ऐतिहासिक कार्य छत्रपती शिवरायांपासून सुरू झालं. ब्रिटिश गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा 'इतिहासकार'ही होता. त्यानं म्हटलंय, ''शिवाजीने ब्राह्मणांना कधीच डोकं वर काढू दिलं नव्हतं. आम्ही त्या सम्राटाचं मराठा राज्य जिंकलंय; पेशव्यांचं नव्हे!''

हा भेद ठाऊक असल्यामुळेच 'मराठ्यांसाठी चार शब्द' लिहिणारे राजारामशास्त्री भागवत (ज्येष्ठ साहित्यिक दुर्गा भागवत ह्यांचे काका) लिहितात, ''शिवाजीची लूट किल्ले बांधण्यासाठी होती, तर पेशव्यांचे दरोडे घर भरण्यासाठी व अंधारातील लावण्यांसाठी होते.'' हा सत्य इतिहास लोकांपुढे येऊ नये, यासाठी पेशवाईत आटोकाट प्रयत्न झाले. आता तेच कार्य ''संघ-भाजप परिवार'' करीत आहे. त्याचा हा नमुना पहा.

देहू (जिल्हा: पुणे) येथील ''गाथा मंदिर''च्या प्रांगणात ''समर्थ रामदास साधक स्वामी निवास'' ही इमारत पोटात ''संत तुकोबाराय गुरुकुल'' घेऊन उभी आहे. हे मालकाला भाडेकरू म्हणून ठेवल्यासारखे आहे. याउलट, रामदास स्वामींनी (सातारा – कराड मार्गावरील) चाफळ येथे स्थापलेल्या राम मंदिर-मठ परिसरात तुकाराम महाराजांच्या नावाने काही दिसत नाही. पण त्या स्थानाचं महत्त्व वाढवण्यासाठी छत्रपती शिवरायांच्या नावाचा वापर करण्यात येतोय. रामदास स्वामींच्या चाफळ मठ परिसरातील एका मंदिराखालील (अंडरग्राऊंड) एक खोली रामदासांच्या भेटीला येणाऱ्या शिवरायांची ध्यानाची जागा म्हणून दाखवली जाते. ह्या मठापासून एक किलोमीटर अंतरावर छत्रपती शिवाजीराजे व रामदास स्वामी यांच्या भेटीचे स्थान आकारास आले आहे. या स्थानाच्या बांधकामाची रचना गावात स्वातंत्र्य लढ्यात हुतात्मा झालेल्याचे स्मरण जागते राहावे, यासाठी अब्दुल रहमान अंतुले यांनी राज्याचे मुख्यमंत्री असताना (१९८०-८१) गावोगावी बांधलेल्या हुतात्मा स्मारकांच्या वास्तूसारखी आहे. ही वास्तू चारही बाजूने लोखंडी ग्रिल्सने बंद केलीय. आतील चबुतऱ्यावर शिवराय व रामदास स्वामींच्या छोट्या मूर्त्या आहेत. त्याखाली ''या वास्तूचे शरद पवार यांनी उद्घाटन केले'' (मुख्यमंत्री, १६ एप्रिल १९९०) अशा मजकुराचा पत्र्याचा बोर्ड आहे. ''सोशल मीडिया''वर सध्या व्हायरल झालेला हा फोटो २०१८ मध्ये ( ह्याच विषयावरील ''सा.चित्रलेखा''तील विषयासाठी-) मी काढलेला आहे. ह्या ''शिव-समर्थ भेट'' स्थळाचे उद्घाटन मुख्यमंत्री पदी असलेल्या शरद पवार यांनी केले असेल, तर दगडाच्या कोनशिलेऐवजी पत्र्याचा बोर्ड का वापरण्यात आला? हा बोर्ड दर्शनी बाजू ऐवजी मागील बाजूस का आहे? मुर्त्या कुलुपबंद का? खोटेपणा पचवण्यासाठीच ही लपवाछपवी आहे ना? असे प्रश्न मी तेव्हा उपस्थित केले होते. आता हाच फोटो शिवराय-रामदास भेटीच्या पुराव्याला शरद पवारांचे समर्थन आहे, अशा थाटात वापरला जातोय.

ही खोटी कामं फत्ते व्हावीत, यासाठी आमदार संजय गायकवाड, भोंदू बागेश्वर, आनंद स्वरूप यांच्या सारख्यांना हत्यारं म्हणून वापरलं जातं. हे देशी जेम्स लेन आहेत. हत्यारांना डोकं नसतं; ते वापरणाऱ्यांना असतं. त्याकडे दुर्लक्ष करू नये.

**जिजाऊंचे स्वराज्यकारण! बहुजनांचे क्षत्रियीकरण!**

हिंदुत्वाच्या आवरणाखाली छत्रपती शिवरायांना 'ब्राह्मणशरण' करून दाखवण्यासाठी खोटी कागदपत्रे-सनदा तयार करून रामदास स्वामी व दादोजी कोंडदेव (मूळ नाव 'दादू कोंडी कुळकर्णी') यांना 'गुरुत्व' देण्यात आले. शिवरायांच्या काळात शाहिरी कला बहरली. ती रणमैदानावरचं शौर्य सांगण्यासाठी होती. अफजलखानाचा कोथळा काढल्यानंतर जिजाऊंनी पुत्रप्रेमाने शाहीर आगीनदास यांच्याकडून शिवगौरवाचा पोवाडा लिहून घेतला. तो आगीनदासानं दरबारात गायला. (यावर लोककला अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ यांनी असंख्य तपशिलांसह पुस्तक लिहिलंय.) तो शिवरायांच्या हयातीतील एकमेव पोवाडा ! त्यानंतर २०० वर्ष पेशवाई होती. त्या काळात अनेक शाहीर झाले. त्यांनी बाजीराव, चिमाजी अप्पा, राघोबादादा, माधवराव, नानासाहेब ह्या पेशव्यांच्या शौर्याचे पोवाडे लिहिले; पण त्यापेक्षा कित्येक अधिक पटीने लावण्या लिहिल्या. शाहिराची ओळख 'लावणीकार' अशी बदलली. परंतु, दखल घ्यावी, असा एकही शिवरायांवर पोवाडा शाहिरांनी लिहिला नाही. शिवरायांच्या ऐतिहासिक कार्याचे विस्मरण व्हावे, असाच व्यवहार पेशवाईत झाला आहे.

ह्या दुष्मनीचे मूळ शिवरायांना स्वराज्याचं स्वप्न देणाऱ्या आणि ते साकार करण्यासाठी सर्वप्रकारचे मार्गदर्शन करणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या ऐतिहासिक कार्यात आहे. विजयनगर वंशातल्या जिजाऊंनी स्वराज्य निर्मितीच्या आड येणाऱ्या ब्राह्मण धर्माचे वर्चस्व हटवून बहुजनांचेही क्षत्रियीकरण केले. त्यामुळे साताराच्या नागेवाडीचा नागनाक महार गडरक्षक-गडकरी झाला. ''होता जिवा म्हणून वाचला शिवा,'' ही म्हण तयार झाली. जिवा महाले हे नाभिक समाजातील होते. ऐतिहासिक कर्तबगारीने ते शिवरायांशी जोडले गेले. परंतु, ह्या जोडीला कुजक्या भटबुद्धीचा ''कवी योगेश'' ह्याने टोपणनावानं ''तांबडी माती'' या चित्रपटातील गीतात घुसडलं आणि ''जिवा-शिवाची बैलजोड'' करून घुमवलं.

अशाच प्रकारचा नीचपणा शेकडो शिवगौरव गीतातून जिजाऊ यांच्या ऐवजी शिवरायांचे 'गुरुत्व' रामदास-कोंडदेवला देऊन केला आहे. त्यासाठी 'गोब्राह्मण प्रतिपालक' हे सोयीचं; पण खोटे बिरुद शिवरायांना चिटकवलं. हे खोटे कर्मकांडी कोण, ह्याचा दाखला देताना आंतरराष्ट्रीय कीर्तीचे 'तुलनाकार' आणि इतिहास-संस्कृती संशोधक डॉ. आनंद पाटील लिहितात, ''१६६३ च्या सुरतेच्या लुटीत त्रास दिला नाही म्हणून 'ईस्ट इंडिया कंपनी'च्या अधिकाऱ्याने शिवरायांना आभाराचे पत्र लिहिले. ते मुस्लीम सेवकाकडे देत तो म्हणाला, 'हे पत्र शिवाजीराजे एकांती असतानाच त्यांना दे. कुठल्याही ब्राह्मणाच्या हाती पडू देऊ नको. ते पत्राला आपली भाषा बोलायला लावतात. राजे पत्राचे उत्तर स्वतःच्या हस्ताक्षरात इंग्रजीत लिहितील. तोपर्यंत थांब. राजे व मातोश्री महत्त्वाची गुप्तपत्रे कुणालाही कळू देत नाहीत,' असे त्याने नोकराला सांगितले.''

ही माहिती छत्रपती शिवरायांची कोणती ओळख सांगते? ज्या जातीला शिवरायांचे चारित्र्य बिघडवता आले नाही; त्याच जातीतली पिलावळ शिवरायांच्या निधनानंतर त्यांचे चरित्र बदनाम करण्याचे काम निरंतर करीत आहे. ब.मो. पुरंदरेंच्या नालायकीचा वारसा, हक्क असल्यागत सांभाळणाऱ्या राज ठाकरे यांनी अलीकडेच ''शिवकालीन इतिहास हा ब्राह्मणांनी वा मराठ्यांनी लिहिलेला नाही; तो इंग्रज-विदेशी इतिहासकारांनी लिहिलाय,'' असं म्हटलंय. ते बरोबरच आहे. तथापि, ब्राह्मण इतिहासकारांनी तो आपल्या सोयीने लिहिलाय, म्हणूनच ब्राह्मणेतर इतिहासकार-अभ्यासकांनी त्यास उपलब्ध असलेल्या अस्सल कागदपत्रांच्या पुराव्यांनी चोख उत्तर दिले आहे.

'प्रबोधन'कार के.सी. ठाकरे म्हणतात, ''हे इतिहासकार म्हणजे एकजात ब्राह्मणी पिसांच्या कोंबड्यांचा खरकटवाडा ! जिजाऊंना अफझलखान वधाचे डोहाळे फुटणार तेव्हा कुठे ह्यांचा 'शिवसंभव' व्हायचा !'' हे इतिहासाचे वर्तमान ज्यांना समजले, ते कोश्यारी-बागेश्वर-आनंद स्वरूप आदींच्या बेतालपणावर तुटून पडणारच! आपला 'मराठी बाणा' दाखवतानाच शिवधर्माचेही दर्शन घडवणार! 'संघ-भाजप'चं भटी हिंदुत्व आणि भारतीय हिंदुत्व ह्यातला भेद दाखवणार!

यासाठी 'प्रबोधन'कार ठाकरे यांचे 'सत्यशोधक' सहकारी दिनकरराव जवळकर यांनी १०० वर्षांपूर्वी शिवाजीराजांवर प्रदीर्घ काव्य लिहिलंय. ते आजही मार्गदर्शक ठरणारं आहे. ते म्हणतात –

***शिवाजी अमुचा राणा । मराठी अमुचा बाणा ।।ध्रु.***
***शिवाने धर्म राखिला । शिवाने शत्रू रगडिला ।।***
***जगविले हिंदू धर्माला । जगविले मायभूमीला ।।१***
***शिवाजी पालक धर्माचा । शिवाजी क्षात्र हाडाचा ।।***
***तयाते शूद्र वदण्याला । नसावी लाज भटजीला ।।२***
***शिवाच्या मर्द मराठ्यांनो । म्हणती भट शूद्र तुम्हाला हो ।।***
***आठवी मानी शिवबांना हो । जनाची लाज माना हो ।।३***
***जगावे जीवन मानाने । राहावे स्वाभिमानाने ।।***
***मराठी हाच हा बाणा । शिवाचा बोल हा माना ।।४***
***भटाचे प्रस्थ मोडावे । रूढीचे पाश तोडावे ।।***
***फुलेंचा असे हा बाणा । शिवाजी-शाहूला माना ।।५***

*(सौजन्य : दै. देशोन्नती / दै. आधुनिक केसरी)*

# क्षमाशीलतेचा विलक्षण अध्याय

२१ मे-१९९१ रोजी रात्रीच्या अकराच्या सुमारास, तमिळनाडूमधील श्रीपेरंबुदूर येथे राजीव गांधींना घातलेल्या पुष्पहारातील स्फोटकांचा आणि थनू या आत्मघाती स्त्रीने स्वतःभोवती लपेटलेल्या बॉम्बचा स्फोट झाला, त्या क्षणी संपूर्ण देश हादरला! अनेकांचे काळीज विदीर्ण करणारी घटना घडली. राजीव गांधी यांच्यासह १४ लोकांचा मृत्यू झाला, ४३ व्यक्ती जखमी झाल्या. देशभरात संताप आणि दुःखाची लाट पसरली!

त्या हत्याकांडात सहभागी असलेल्या लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम या संघटनेच्या सदस्यांपैकी नलिनी श्रीहरन ही एक मुख्य आरोपी होती. आधी तिला मृत्युदंडाची शिक्षा झाली. मात्र, वर्षानुवर्षे तुरुंगवास भोगल्यानंतर, २००८ मध्ये एक अत्यंत भावनिक आणि वादग्रस्त घटना घडली.

एके दिवशी वेल्लोर तुरुंगात नलिनीला भेटण्यासाठी राजीव आणि सोनिया यांच्या कन्या असलेल्या प्रियंका गांधी स्वतः तिथे पोहोचल्या. त्या भेटीची तयारी प्रियंकांनी स्वतः केली होती.

सोनिया गांधींना या भेटीबद्दल माहिती होती, पण त्यांनी प्रियंकांना त्यांच्या अंतर्मनाचा आवाज ऐकण्याची मुभा दिली होती. नलिनीला ज्या बराकीत ठेवण्यात आलं होतं, तिथे प्रियंका पोहोचल्या. प्रत्यक्ष भेटीच्या वेळी व्हिजिटर्स रूममध्ये स्वतः प्रियंका नलिनीसमोर बसल्या.

तो प्रसंग जितका अभूतपूर्व होता तितकाच गूढ आणि गंभीर होता. कारागृहातल्या वातावरणात एक प्रकारचा तणाव होता. प्रियंकासमोर बसलेल्या नलिनीने आपले डोळे खाली जमिनीकडे रोखले होते, तिने नजर वर करून पाहिलेच नाही.

प्रियंकांनी शांत, पण दृढ स्वरात तिला विचारले, तुम्ही माझ्या वडिलांना का मारले?

त्यांच्या या प्रश्नासरशी नलिनीच्या संयमाचा बांध सुटला! ती शोकाकुल झाली. आपल्या कृत्याबद्दल तिने पश्चात्ताप व्यक्त केला. त्या क्षणी प्रियंकांनी एक अत्यंत असामान्य आणि हृदयस्पर्शी वाक्य उच्चारले, त्या म्हणाल्या, मी तुम्हाला माफ करतेय.



ही माफी केवळ वैयक्तिक नव्हती. ती एका मुलीने आपल्या वडिलांच्या हत्येच्या आरोपीला दिलेली माफी होती. देशाने ज्यांच्यावर प्रेम केले त्या दिवंगत पंतप्रधानांच्या मुलीने साऱ्या सहिष्णू, संवेदनशील, स्नेहार्द्र जनतेच्या वतीने दिलेली माफी होती!

नंतरच्या काळात प्रियंकांनी एका मुलाखतीत सांगितलं की, माझ्या वडिलांच्या हत्येच्या आरोपीला मी भेटले हे खरंय. मी तिला माफ केले. कारण मला माहीत आहे की, मनात राग आणि सूडभावना तशाच ठेवल्याने दुःख कमी होत नाही. माझ्या आईंनीही मला याच मार्गावर चालण्याची शिकवण दिली आहे.

या घटनेने संपूर्ण देशात खळबळ माजली. अनेकांनी प्रियंकांच्या या निर्णयाची प्रशंसा केली आणि त्यांना गांधी कुटुंबातील करुणेचे प्रतीक म्हटले. काहींना हे पटले नाही; त्यांनी प्रियंकांना दूषणे दिली. वडिलांसोबत विश्वासघात केल्याचा आरोपही केला.

प्रियंकांनी या टीकेला उत्तर देताना स्पष्ट केले की, ही माफी वैयक्तिक आहे आणि कायद्याच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणारी नाही. दिवंगत वडिलांची मुलगी म्हणून आपण हे करू शकतो, असे त्यांचे म्हणणे होते.

नंतरच्या वर्षांत, २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ए. जी. पेरारिवलन या आणखी एका आरोपीला ३१ वर्षांच्या तुरुंगवासानंतर मुक्त करण्याचा आदेश दिला. या प्रकरणातही प्रियंका, राहुल आणि सोनिया गांधी यांनी कोणताही विरोध दर्शवला नाही.

राहुल आणि प्रियंकांनी यावर भाष्य करताना सांगितले की, न्यायालय जो निर्णय घेईल, तो आम्ही स्वीकारू. या घटना राजीव गांधींच्या हत्याकांडातील मानवी दयाभावाचा करुणार्त बिंदू होत. एक विलक्षण भावनिक अध्याय म्हणूनही याकडे पाहता येईल.

प्रियंका गांधी यांनी दाखवलेली क्षमाशीलता ही केवळ एक राजकीय भूमिका नव्हती, तर एका मुलीने आपल्या वडिलांच्या हत्येच्या वेदनेतून बाहेर पडून, सूडाच्या वर्तुळाला तोडण्याचा प्रयत्न होता.

ही घटना राजीवजींच्या कुटुंबात रुजलेल्या 'करुणा' आणि 'क्षमा' या मूल्यांची साक्ष देते, ज्यामुळे ते भारतीय राजकारणात वेगळे ठरतात.

ही क्षमा निश्चितच सोपी नव्हती. ती अत्यंत कठीण आणि आत्मसंयमाची परीक्षा घेणारी होती. क्षमा करणं प्रियंकांना जमलं, कारण एखाद्या व्यक्तीने क्रोधाच्या पश्चात्तापात होरपळत जगणं हे मृत्यूहून अधिक वेदनादायी असतं, असं त्यांचं मत आहे.

सूडाच्या भावनेने पछाडलेल्या आणि द्वेषाच्या भवसागरात खोल बुडालेल्या आजच्या विषाक्त काळात कारुण्याने, मानवतेने भारलेल्या अशा गोष्टी समोर येतात तेव्हा हायसं वाटतं.

प्रियंका यांचं आपल्या वडिलांच्या खुन्याला माफ करणं हाच राजीव गांधी यांचा संस्कार आहे आणि भारतीय संस्कृतीने जोपासलेली मानवतेची मूल्येदेखील हेच सांगत आली आहेत की, मारणाऱ्या व्यक्तीपेक्षा क्षमा करणारा महान असतो, कारण क्षमा करण्यासाठी अतिशय उदात्त अंतःकरण लागतं, मन विशाल असावं लागतं, जे मारणाऱ्यापाशी नसतं!

आज राजीव गांधी यांचे पस्तीसावे पुण्यस्मरण. या घटनेकडे मागे वळून पाहताना अनेकांच्या मनातला विखार नष्ट झाला आहे. राजीव गांधी यांच्यासाठी ही सर्वोत्तम श्रद्धांजली ठरावी! दरवर्षी या भावनेच्या परिघात वाढ होतेय, ही त्यांच्या वैचारिक प्रसाराची प्रचिती होय!

***...समीर गायकवाड***

# भारत हा काही नरक नाही

१. आपल्याला २०,००० वर्षांची महान संस्कृती लाभली आहे.
२. आपल्याकडे सर्वोत्तम आणि प्रामाणिक न्यायाधीश आहेत, जे गरिबांवर प्रेम करतात.
३. आपल्या देशात अजिबात भ्रष्टाचार नाही.
४. आपली मंदिरे पवित्र आणि शाकाहारी आहेत.
५. आमचे ब्राह्मण दयाळू आणि उदार आहेत.
६. आमचे सनदी अधिकारी (नोकरशहा) राष्ट्राची सेवा करतात.
७. आमचे व्यावसायिक कर भरतात आणि त्यांना दानधर्म करायला आवडते.
८. आमच्या नद्या स्वच्छ आहेत.
९. आमच्या हवेत अजिबात प्रदूषण नाही.
१०. आमचे सण पर्यावरणपूरक आहेत.
११. आमचे मुस्लिम बांधव आनंदाने ब्राह्मणांना नियमितपणे पैसे देतात.
१२. आमचे ख्रिश्चन बांधव सनातनी शाळांमध्ये प्रवेश घेतात.
१३. आमच्या मिशनरी शाळांमध्ये 'वंदे मातरम' हे भजन शिकवले जाते.
१४. संसदेत प्रत्येकजण नेहरूंचा विचार न करता देशाचा विचार करतो.
१५. आम्ही जगातील सर्व समस्या योग आणि वेदांताद्वारे सोडवतो.
१६. जैन व्यावसायिकांना आनंद देण्यासाठी भारतातील सर्व मांस आणि मासे परदेशात विकले जातात.
१७. सर्व तरुण पुरुषांकडे नोकऱ्या आहेत.
१८. सर्व तरुण स्त्रिया मुलांना जन्म देतात, घरी राहतात आणि टिकली अन् बांगड्या परिधान करतात.
१९. समलिंगी पुरुष आनंदाने सनातनी मुलींशी लग्न करतात आणि समलिंगी मुली सनातनी मुलांशी लग्न करून आनंदी आहेत.
२०. पाश्चात्य प्रचार दिशाभूल करणारा आहे. इथे जातीव्यवस्था कधी अस्तित्वातच नव्हती.
२१. आमचे गुरुजी साधे आहेत आणि त्यांना प्रसिद्धीची हाव नाही.
२२. सर्व मंदिरांमध्ये आता फक्त रामाचीच मूर्ती आहे.
२३. आम्ही हिंदीमध्ये इंग्रजी बोलतो.
२४. प्रत्येकाला भारतात स्थलांतरित व्हायचे आहे - आणि कधीही सोडून जायचे नाही.

या पोस्टला लाईक न करणारे अर्बन नक्षल आहेत. त्यांनी NRI बनून निघून जावे.

***...देवदत्त पट्टनाईक / FB***

# प्रधानमंत्री सौर घर योजनेला घोडा; मालकांच्या तिजोरीत भर?

या देशाचे मालक कोण, याचं उत्तर पाहिजे असेल तर सरकारच्या या निर्णयाचा नेमका अर्थ समजून घ्या.

**प्रधानमंत्री सौर घर योजना देशभरात लागू आहे? आहे. घरगुती, व्यावसायिक वीजनिर्मिती सोलर सिस्टीम लावण्यासाठी अनुदान मिळत आहे? आहे. अपारंपरिक ऊर्जानिर्मिती चांगली गोष्ट आहे ना? आहे. त्यामुळे काही प्रमाणात का होईना, प्रदूषण करणाऱ्या वीजनिर्मितीचे प्रमाण कमी झालेले आहे.**

आधी या योजनेत अतिरिक्त वीज तयार झालेली वीज मंडळ घेऊन ग्राहकांना कमी दराने का होईना, मोबदला देत होतं. आता मोबदला बंद झाला. हरकत नाही, निदान लोकांना वीज बिल शून्यावर आलेलं आहे, याचं समाधान आहे.

**आता नवीन नियम. महाराष्ट्र नियामक आयोगाने आणलेली नवीन नियमावली किंवा धोरण. ३-१०, १०-१०० आणि १०० पेक्षा जास्त किलोवॅट वीजनिर्मिती क्षमता असणाऱ्या संचाला १.९० पैसे प्रती युनिट सरकारला पैसे द्यावे लागणार आहेत. म्हणजे अपारंपरिक वीजनिर्मितीसाठी प्रोत्साहन लांब राहील, उलट भुर्दंड बसणार.**

पूर्वी वीज वापर करून जास्तीचे युनिट पुढल्या महिन्यात समायोजित केले जायचे, ते होणार नाही. जेवढी निर्मिती कराल, तेवढी तुम्हाला वापरावी लागेलच, तेही याच महिन्यात. मग मोठे कारखाने, मॉल, व्यापारी आस्थापना बचतीसाठी म्हणून जी गुंतवणूक करून बसल्या आहेत, त्याचा उपयोग शून्य? शून्य.



उलट भुर्दंड बसणार असेल, तर नव्याने कशाला कोण सोलरच्या भानगडीत पडेल? आणि आणखी एक हुशारी. ०-३ केव्ही वाले ग्राहक यातून वगळले आहेत, म्हणजे घरगुती वीजनिर्मिती नियमनात बदल नाहीत, त्यामुळे जास्त बोंबाबोंब करण्याचा प्रश्न नाही.

**हे कशासाठी? तर महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनी (महा जेनको) दोनपैकी एका कोळसेवाल्या महाराष्ट्राच्या मालकाच्या कंपनीसोबत पंचवीस वर्षांचा वीज खरेदीचा करार करणार आहे. मग जर लोकांनी मोठ्या प्रमाणावर सोलर वीजनिर्मिती केली, तर साहजिकच विजेची मागणी कमी होईल आणि मग मालकांच्या मालकांची वीज कमी खरेदी केली जाईल.**

मग याला उपाय काय? अशी खुट्टी ठोकायची की लोकांनी सोलर संच काढून फेकले पाहिजेत. म्हणजे प्रधानमंत्री सौर घर योजनेला घोडा लावून कोळसेवाल्या मालकांच्या तिजोरीत भर घालायला निघालेत.

**आणखी एक गंमत. इथे भलेभले आयोग आणि लवाद मालकांना विचारल्याशिवाय डबडं घेऊन परसाकडं जात नाहीत, तिथे हा निर्णय सरकारला न विचारता घेतला असेल? ऊर्जामंत्री मधाच बोट लावायला म्हणताहेत, ''आम्ही या निर्णयाच्या विरोधात अपील करू.'' कुठे करणार?**

आता सांगा, प्रधानमंत्री सौर घर योजनेला डावलून निर्णय घेतले जाणार असतील, तर देशाचे नेमके मालक कोण, याचं उत्तर मिळालं का?

वेलकम टू अम्बदानीस्थान

*...आनंद शितोळे*




ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील गावदेवी भाजी मार्केट येथे लागलेल्या भीषण आगीप्रकरणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने मा. पोलीस आयुक्त, ठाणे यांना निवेदन सादर करण्यात आले.

सदर प्रकरणाची पारदर्शक, निष्पक्ष व सखोल चौकशी करून संबंधित जबाबदारांवर तात्काळ Suo Moto कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे नागरिकांच्या जीवितासह व्यापाऱ्यांच्या उपजीविकेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या घटनेमागील कारणे, संभाव्य निष्काळजीपणा, सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी व संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित होणे अत्यंत आवश्यक आहे.



ठाणे स्टेशन येथील रिक्षा-टॅक्सी चालकांच्या तसेच वाहतूक कोंडी व इतर समस्यांच्या अनुषंगाने, ठाणे शहर वाहतूक विभागाच्या सिनिअर पोलीस इन्स्पेक्टर मा. रोहिणी सोनार मॅडम व पोलीस सब-इन्स्पेक्टर मा. श्री. विजय कांबळे साहेब यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली. त्यावेळी त्यांच्याकडून समस्यांवर लवकरात लवकर तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

यावेळी, धर्मराज्य पक्षाचे सचिव श्री. नरेंद्र पंडित, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे सचिव श्री. समीर चव्हाण, स्थानिक रिक्षा-टॅक्सी चालक-मालक युनियनचे श्री. सुशिलकुमार चंद्रा, श्री. रवि मिश्रा व इतर सहकारी उपस्थित होते.

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**